दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५८ | शुक्रवार, दि.१० जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

अखेर गंगेत घोडं न्हालं!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषकांचे स्वप्न बुधवारी (८ जानेवारी २०२५) अधिकृतपणे पूर्ण झाले. वास्तविक हे स्वप्न ४ ऑक्टोबर २०२४ रोजीच पूर्ण झाल्याचे उघड होत आहे. केंद्राच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर दुस–याच दिवशी म्हणजे ४ ऑक्टोबर २०२४ रोजी त्या संदर्भातील अधिसूचनाही काढली. त्यामुळे मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषेचा दर्जा तीन महिन्यांपूर्वीच मिळाला. परंतु विधानसभा निवडणूक आणि त्यानंतर सत्तेसाठीची साठमारी यामुळे आपल्यालाच तो प्राप्त करून घेण्यास उशीर झाला हे उघड आहे.

तांत्रिक अडचणीने हजारो शेतकऱ्यांचा जीव टांगणीला

मुदतवाढ मिळाली पण अडचणी तशाच; सोयाबीन विक्रीसाठी नाफेडकडे डोळे

संभाजीनगर । प्रतिनिधी

सध्या राज्यात सोयबीन शेतकऱ्यांचे भाव, बारदाना, विक्रीवरून ससेहोलपट सुरू आहे. तांत्रिक अडचणीने सध्या राज्यातील काही जिल्ह्यातील शेतकरी हैराण झाले आहेत. नोंदणीची वेळ निघून गेल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. मुदतवाढ देण्यात आली असली तरी शेतकऱ्यांसमोर ज्या अडचणी होत्या त्या तशाच आहेत. त्यामुळे सोयाबीन विक्री करताना काही प्रमाणात का होईना शेतकऱ्यांना फटका बसत आहे.

तीन महिन्यापासून सोयाबीनचा भाव जैसे थे!

नाफेडला सोयाबीन विक्री केल्यास शासनाने जाहीर केलेला दर मिळत आहे. खासगी व्यापाऱ्यांकडून मात्र ४ हजार ते ४ हजार १०० रुपये दर दिला जात आहे. गेल्या तीन महिन्यापासून राज्यात सोयाबीनचा भाव जैसे थे आहे. नाफेडला सोयाबीन देणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने विक्री करण्यास विलंब होत असून पैसे सुध्दा उशिराने मिळत आहेत. त्यामुळे खासगी व्यापाऱ्यांकडून आता तरी सोयाबीनला चांगला भाव दिला जाईल, या आशेवर शेतकरी आहेत.

शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीसाठी नाफेडने ६ जानेवारीपर्यंत ◀◀ पान २ वर

शिक्षकांच्या पगारीसाठी अजितदादांचा थेट मंत्रालयात फोन

मुंबई । प्रतिनिधी

शिक्षकांचे पगार रखडल्याने सध्या नाराजी व्यक्त केली जात असताना अजित पवारांनी थेट पत्रकार परिषदेतून अर्थ मंत्रालयात फोन करुन पगार करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक खर्चाचा भर राज्य सरकारच्या तिजोरीवर पडल्याने विविध खात्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी याबाबतची खंत देखील व्यक्त केली होती. मात्र, शासनाकडून हे फेटाळण्यात येत असून लाडकी बहीण योजनेसाठी पैशांची तरतूद करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. त्यातच, या महिन्यात राज्यातील शिक्षकांच्या पगारी थांबवण्यात आल्याचेही वृत्त माध्यमांत झळकले होते. शिक्षकांना यंदाच्या महिन्यात पगारी २ ते ३ दिवस उशिरा मिळणार असल्याचे वृत्त होते. अद्यापही काही शाळांमध्ये शिक्षकांना पगारी न मिळाल्यासंदर्भात आज अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नावर अजित पवार यांनी लगेच अर्थ विभागाच्या सचिवांना फोन लावला, शिक्षकांचा पगार का झाला नाही? याची पत्रकार परीषदेतूनच फोन लावून विचारपूस केल्याचे पाहायला मिळाले आहे. अजित पवारांनी अर्थ विभागाच्या सचिवांशी बोलताना ◀◀ पान २ वर

धनंजय मुंडेंचा राजीनामा न घेण्यावर अजित पवार ठाम

संतोष देशमुख खून प्रकरण: चौकशीत तथ्य आढळल्यावर निर्णय घेणार

पुणे । प्रतिनिधी

संतोष देशमुख खून प्रकरण आणि खंडणी प्रकरणानंतर मंत्री धनंजय मुंडे यांचा विरोधकांसह सत्ताधारी आमदारांकडून राजीनामा मागण्यात येत आहे. मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी अखेर मौन सोडले असून मुंडेंचा राजीनामा न घेण्यावर आपण ठाम असल्याचेही यावेळी अजित पवारांनी सांगितले. संतोष देशमुख खून प्रकरणात आपला काडीचाही संबंध नसल्याचे मुंडेंनी ठामपणे सांगितल्याचेही ते म्हणाले असन चौकशीत ते दोषी आढळल्यावर निर्णय घेणार असल्याचे ते म्हणाले.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली. या घटनेला महिला उलटून गेला तरी अद्याप मुख्य आरोपी फरार आहे. दरम्यान, संतोष देशमुख हत्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे ◀◀ पान २ वर

मुन्नी कोण हे सुरेश धसांना विचारा

आ. सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एक बडी मुन्नी असून तिच्या सांगण्यावरुन अमोल मिटकरी आणि सुरज चव्हाण बोलतात, असे म्हटले होते. त्यावर बोलताना अजित पवार म्हणाले, मी नाव घेऊन कधीही बोलतो, मुन्नी कोण हे सुरेश धस यांना विचारा, सुरेश धस यांनी मुन्नी कोण हे नाव घेऊन सांगावे, असे म्हटले आहे.

आकाच्या ड्रायव्हरच्या नावे ७५ कोटींचा फ्लॅट

सुरेश धस यांचे वाल्मिक कराडवर आरोप; परळीत इराणी टोळी सक्रीय

मी सोमनाथकडे परभणीला जाऊन आलो. त्यांनाही न्याय मिळाला पाहिजे ही आमची भूमिका आहे. परळीत इराणी समाजाचे काही लोक आहेत ते गांजा चरस विकतात. यांच्या जीवावर, त्यांच्या कडून हिस्सा मिळवायला आकाने पोलीस ठेवले होते. यातला हिस्सा त्यांच्या आकालाही जायचे, थर्मलमध्ये, भंगारमध्ये यांचा वाटा होता, आका आणि आकाच्या आकाला सगळ्यांना हिस्सा मिळतो, असा आरोप भाजप आ. सुरेश धस यांनी केला आहे. तसेच पुण्यात आकाच्या ड्रायव्हरच्या नावे ७५ कोटीचे फ्लॅट असल्याचेही ते म्हणाले. धस पुढे म्हणाले, करुणा असो की डॉ देशमुख असो त्यांचे चारित्र्य हनन यांनी केले. परळीत पोलीस आका आणि वरिष्ठ आका यांच्या इशाऱ्यावर सगळं काही जमा करतात, असे ते म्हणाले. सगळ्या कंपन्यांकडून यांना हफ्ता जातो. यांच्या हफत्याला कंटाळून कोरोमांडल कंपनी निघून गेली. ◀◀ पान २ वर

लोणावळा रिसोर्टवर १० दिवस कोण होते?

संतोष देशमुख याने दलित मुलाला मारले म्हणून आरोपीला एक चापट मारली होती त्याच फळ काय निर्घृण खून केला. मुद्दे पालटवायला कलाकार आणतात आणि त्यांना पुढे करतात. ते काहीही बोलतात. रिसॉर्ट लोणावळा १० दिवस कोण कुणासोबत राहिले याचीही माहिती माझ्याकडे आहे. मला जास्त बोलायला लावू नका, असे धस म्हणाले.

धनंजय मुंडे यांनी षडयंत्र सुरु केले

मनोज जरांगे यांचे गंभीर आरोप

पैठण– या धनंजय मुंडेने जे प्रयोग सुरु केले आहेत, या धनंजय मुंडेने जे षडयंत्र सुरु केले आहेत, तो जे लोकांना आता सांगतोय की, मोर्चे काढा, आंदोलने करा. हे सर्व धनंजय मुंडे यांचं काम आहे. दुसरं कोणाचं नाही, असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणी न्याय मिळावा या मागणीसाठी पैठण येथे मोर्चा काढण्यात आला. यावेळी जरांगे बोलत होते.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करुन त्या प्रकरणाचा सखोल छडा लावावा, या मागणीसाठी पैठण येथे मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात संतोष देशमुख ◀◀ पान २ वर

धनंजय मुंडे हा या गोष्टी त्या गुंड टोळीच्या जीवावरती

जर राज्यात काही घडले, कोणताही माणूस मेला किंवा मारला, तर आरोपीला साथ द्यायची तर सर्वात आधी जाती–धर्माची लोकं समोर येतील. या राज्यातले आणि देशातले पहिले उदाहरण आहे की, धनंजय मुंडे हा या गोष्टी त्या गुंड टोळीच्या जीवावरती घडवून आणायला लागला आहे. मी त्यादिवशी परभणीला काय बोललो? धनंजय देशमुखांना त्या धनंजय मुंडेंच्या लोकांनी धमकी दिली. या राज्यातील लोकं म्हणत आहेत की, संतोष देशमुखांच्या वेळेस त्याचवेळी अॅट्रॉसिटी दाखल झाला असता तर संतोष देशमुख यांचा खून झाला नसता, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.

वाल्मिक कराडच्या डोळ्याला संसर्ग

जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांकडून तपासणी

बीड: पवनचक्की प्रकल्प मॅनेजरला दोन कोटींची खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मिक कराड सध्या सीआयडी कोठडीत आहे. यादरम्यान त्याच्या डोळ्याला संसर्ग झाल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची एक टीम कराडच्या डोळे तपासणीसाठी गेली होती. यावेळी त्याचे डोळे तपासून औषधोपचार आणि ड्रॉप देण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे. कस्टडीत असलेल्या वाल्मिक कराडची झोप पूर्ण होत नसल्याने ◀◀ पान २ वर

१५ पैकी ८ गुन्ह्यात कराड निर्दोष

वाल्मिक कराड याच्यावर १५ गुन्हे दाखल आहेत, ८ गुन्ह्यात निर्दोष मुक्तता मिळाली आहे, तर खंडणीसह ४ प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेत. वाल्मिक कराड यांच्यावर दाखल गुन्ह्यासंदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. एकीकडे वाल्मिक कराड यांच्यावर १५ गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. १५ पैकी ८ गुन्ह्यात कराड यांची निर्दोष मुक्तता झालेली आहे.

लाडकी बहिण समितीचे अध्यक्ष वाल्मिक कराड

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा लाडकी बहिण योजनेच्या परळी समितीचा अध्यक्ष असून त्याच्यावर बरेच गुन्हे दाखल असताना त्याला अध्यक्ष केले कसे? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तसेच ही निवड धनंजय मुंडे यांच्या शिफारसीवरुन केल्याचेही समोर आले आहे. शिवाय कराड हा जिल्हा नियोजन समितीचा सदस्य सुध्दा आहे.

परभणीत लक्ष्मण हाकेंचा माईक हिसकावला

भाषण थांबवले; दलित कार्यकर्ता संतापला, वाल्मिक कराडची बाजू का घेता?

परभणी : तुम्ही वाल्मिक कराडची बाजू घेता म्हणत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या हातातील माईक घेत दलित कार्यकर्त्याने भाषण थांबवले. याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

जनआक्रोश मोर्चामध्ये आ. सुरेश धस, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात भाषणेही केली जात आहेत. मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले जात आहेत. मात्र, आता या जनआक्रोश मोर्चाच्या विरोधात ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वात मोर्चे काढले जात आहेत. तसेच, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केल्यामुळे आमदार धस, अंजली दमानिया व मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध ह्या मोर्चातून आवाज उठवला जात आहे. मात्र, परभणी शहरात आज दलित कार्यकर्त्यांनी या मोर्चात लक्ष्मण हाकेंच्या हातातील माईक घेत त्यांचे भाषण थांबवल्याचे पाहायला मिळाले. वाल्मिक कराडचे ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.९ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: २.०० क्विंटल			
	२,८९०	३,६११	३,१४९
ज्वारी/हायब्रिड: २५.०० क्विंटल			
	१,९०१	२,८००	२,२२२
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : १७५.०० क्विंटल			
	४,४००	७,६६३	७,२८७
उडीद : ४.५० क्विंटल			
	५,४१०	६,७००	६,०५५
बाजरी: ६.०० क्विंटल			
	२,४५१	४,३००	३,६८३
मुग : २.०० क्विंटल			
	५,०००	५,०००	५,०००
सोयाबीन: १०४.०० क्विंटल			
	४,०७५	७,४००	४,६४३
हरभरा: ८.५० क्विंटल			
	४,३००	५,४००	४,८५०

महाराष्ट्रात 'या' ११ दिग्गजांनी दिला होता राजीनामा

मुख्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्र्यांनी आरोपानंतर नैतिकतेतून घेतला निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

सरकार असेल किंवा विशेषत: अजित पवारांवर मुंडेंच्या राजीनाम्याचा दबाव वाढला आहे. त्यातच अजित पवारांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली. तर इकडे मंत्रिपद वाचवण्यासाठी धनंजय मुंडेंनी लॉबिंग सुरु केल्याची माहिती आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या राजकारणात याआधी देखील अनेक दिग्गज मुख्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्र्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. यात ११ दिग्गजांचा समावेश होता.

राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर, मंत्रिपदाची खुर्ची वाचवण्यासाठी धनंजय मुंडेंनी लॉबिंग सुरु केली आहे. मंत्री धनंजय मुंडेंनी अजित पवारांची भेट घेवून चर्चा केली. धनंजय मुंडेंनी प्रफुल्ल पटेलांचीही भेट घेतली. तर प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंसोबत मुंडेंनी फोनवरुन चर्चा केली. विरोधकांसह स्वपक्षीय आणि मित्रपक्षांच्या आमदारांकडूनही मंत्री मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. धनंजय मुंडेंचा राजीनामा जितेंद्र आव्हाड, ◀◀ पान २ वर

नैतिकतेतून यांनी दिला राजीनामा

मनोहर जोशी यांच्यावर जावयाच्या भूखंड प्रकरणात आरोप झाले होते. त्यांनाही मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. विलासराव देशमुख यांना २६/११च्या हल्ल्यानंतर ताज हॉटेलमध्ये दिग्दर्शक रामगोपाल वर्माला नेणं भोवले होते. त्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. अशोक चव्हाण यांनी आदर्श घोटाळा प्रकरणात आरोपानंतर राजीनामा दिला. आर. आर. पाटलांनीही दहशतवादी हल्ल्यानंतर बडे बडे देशो मे छोटे छोटे हादसे होते है, असे वक्तव्य केल्यानंतर राजीनामा दिला होता. अजित पवार यांच्यावर सिंचन घोटाळ्यात आरोप झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. एकनाथ खडसे यांनी भूखंड घोटाळा प्रकरणात आरोप झाल्यानंतर राजीनामा दिला होता. अनिल देशमुख, गृहमंत्री असताना १०० कोटींच्या वुसलीचे आरोप झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. संजय राठोड यांना एक तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात आरोप झाल्यानंतर राजीनामा द्यावा लागला होता. छगन भुजबळ यांनी तेलगी घोटाळा प्रकरण समोर आल्यानंतर नैतिकतेतून राजीनामा दिला होता. तेव्हा ते राज्याचे उपमुख्यमंत्री होते.

अग्रलेख

अखेर गंगेत घोडं न्हालं!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषकांचे स्वप्न बुधवारी (८ जानेवारी २०२५) अधिकृतपणे पूर्ण झाले. वास्तविक हे स्वप्न ४ ऑक्टोबर २०२४ रोजीच पूर्ण झाल्याचे उघड होत आहे. केंद्राच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर दुस-याच दिवशी म्हणजे ४ ऑक्टोबर २०२४ रोजी त्या संदर्भातील अधिसूचनाही काढली. त्यामुळे मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषेचा दर्जा तीन महिन्यांपूर्वीच मिळाला. परंतु विधानसभा निवडणूक आणि त्यानंतर सत्तेसाठीची साठमारी यामुळे आपल्यालाच तो प्राप्त करून घेण्यास उशीर झाला हे उघड आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा अध्यादेश बुधवारी नवी दिल्लीत जारी करण्यात आला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देत असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी केली होती. ही घोषणा झाली असली तरी त्याबाबतचा अध्यादेश निघाला नव्हता. शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी गेल्या आठवड्यात हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर बुधवारी (८ जानेवारी) राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नवी दिल्लीत हा अध्यादेश प्राप्त झाल्याची माहिती प्रसारमाध्यमांना दिली.

देशातील कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही निकष पूर्ण करावे लागतात. ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असावी लागते. त्या भाषेत समृद्ध ग्रंथ व साहित्य परंपरा असणे आवश्यक असते. हे साहित्य मूळ भाषेत लिहिलेले असावे, भाषेचा प्रवास अखंडित असावा त्याचप्रमाणे प्राचीन व वर्तमान भाषेतील नाते सुस्पष्ट असावे अशा अटी आहेत. अमळनेर येथे झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठीचा ठराव मांडण्यात आला. त्यानंतर एक समिती स्थापन करण्यात आली. प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत सरहद्द संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांचा समावेश होता.

या समितीने ३१ मे २०१३ रोजी केंद्र सरकारकडे आपला अंतिम अहवाल सुपुर्द केला. ज्ञानेश्वर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक पाठपुरावा समितीही तयार करण्यात आली होती. तब्बल दहा वर्षांनंतर गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने मराठीला अभिजात दर्जा देण्याची घोषणा केली. परंतु नंतर काहीच हालचाल न दिसल्याने विरोधक हा निवडणुकीचा जुमला होता काय अशी टीका करू लागले. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची घोषणा झाली होती. मात्र तीन महिने उलटूनही शासन आदेश जारी न झाल्याने निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे अभिजात दर्जाबाबतचा शासन आदेश सुपुर्द करण्यात आला. त्यामुळे आता मराठी भाषा ही अधिकृतपणे अभिजात भाषा ठरली आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर जे काही लाभ मिळतात, ते मिळवण्यासाठी आम्ही तातडीने प्रस्ताव सादर करणार आहोत असे सामंत म्हणाले. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने तसेच मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या वतीने पंतप्रधान मोदी व केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार मानले. मराठी भाषेतील काम साहित्यिकांना विश्वासात घेऊन केले जाईल. दिल्ली आणि अन्य भागात मराठी शाळा आहेत. त्या शाळा सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न राहील. मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले जातील असे उदय सामंत यांनी म्हटले आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचे औपचारिक आभार मानण्यासाठी खरे तर सामंत यांनी शेखावत यांची भेट घेतली होती. त्याच औपचारिकतेतून शेखावत यांनी बुधवारी अधिसूचनेची प्रत सामंत यांच्याकडे सुपुर्द केली. पुण्यामध्ये ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी असे तीन दिवस विश्व मराठी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या उद्घाटनाला केंद्रीय मंत्री शेखावत उपस्थित राहणार आहेत. तर राजधानी दिल्लीमध्ये २१ ते २३ फेब्रुवारी या काळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असून त्यासाठी २ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

केंद्रीय अधिसूचना काढल्यामुळे अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राचे आर्थिक सा मराठी भाषेलाही मिळेल. अभिजात भाषांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार दरवर्षी २५० ते ३०० कोटी रुपयांचे अनुदान देते. त्यातील निधीचा उपयोग मराठी ग्रंथ व साहित्याचा प्रचार, ग्रंथालये उभारणी, मराठी भाषेच्या प्रचारासाठी भाषा भवनाची उभारणी आदी विविध कामांसाठी करता येऊ शकतो. नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय 'पर्यायी' केल्याची चर्चा सुरू असताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी 'मराठी अनिवार्यच' अशी स्वागतार्ह भूमिका घेतली आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या तसेच बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक असून, शाळांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही अशी स्पष्ट ताकीद मंत्री भुसे यांनी दिली आहे.

राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय झाला असला तरी सीबीएसई, आयसीएसई, केंद्रीय शाळांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात चालढकल केली जाते याकडे लक्ष द्यावे लागेल. इंग्रजी भाषा आवश्यक असली तरी राज्यात मराठीचे महत्त्व सर्वांत जास्त आहे. इंग्रजी भाषेत शिकणारी मुले घरात मराठीत बोलतात पण त्यांचे मराठीचे अज्ञान लपवता येत नाही. या मुलांना मराठी संस्कृतीचे भान राहत नाही. आई-बाबा विसरून मम्मी-डॅडीचे फॅड अंगवळणी पडताना दिसते, घरातला सुसंस्कृतपणा लयाला जातो हे भयंकर आहे. मराठमोळ्या मातीत मराठी भाषा आलीच पाहिजे, त्यासाठी मराठी शिकवली पाहिजे, तरच मराठीचा दर्जा टिकणार आहे.

गेवराईच्या समर्थ विजय एलीगार चे सी.ए. परीक्षेत यश

गेवराई । प्रतिनिधी

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया मार्फत घेण्यात येणाऱ्या सनदी लेखापाल अर्थात सी ए या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून यामध्ये गेवराई येथील समर्थ विजय एलीगार (लाड) याने उत्तीर्ण होवून घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

गेवराई शहरातील विजय एलीगार यांचे जेष्ठ चिरंजीव समर्थ विजय एलीगार चे प्राथमिक शिक्षण हे चिंतेश्वर विद्यामंदिर गेवराई येथे झाले , त्यानंतर पुढील शिक्षण सेंट झेवियर्स, शारदा विद्या मंदिर येथे झाले. दहावीत ९६.टक्के घेवून तो उत्तीर्ण झाला होता. महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथील बी.एम.सि.सि. (बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स) होऊन पुढे बी.कॉम.पुर्ण करत सि.ए.परीक्षेत त्याने घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, युवा नेते शिवराज पवार, युवा नेते रणवीर पंडित, मुख्याध्यापक जगदाळे, लुंगारे, बोर्डे, काकडे, लोमटे मॅडम, श्रीदेवी लाड यांचे मार्गदर्शन मिळाले तर या यशाबद्दल त्याचे अभिजित जैस्वाल, संजय राठोड, जीवन दाभाडे, महेश दाभाडे, मधुकर घुंबार्डे, किरण मदुरे ,दत्ता झेंडेकर, पत्रकार विनोद पौळ, पत्रकार अमोल कापसे, माऊली डेंगळे ,रणजित जैस्वाल, गोरे आबा, राम हादगुले, उमेश हादगुले, महेश सोसे, आनंद नावडे, भिवराज मुळूक, किशोर राऊत, संदीप लगड, दादासाहेब खडके, मगन दायमा, घोटणकर भावजी, अक्षय कुलकर्णी, योगेश कापसे, नाटकर, किरण शेंद्रे, गणेश पंडित, गर्कळ सर सर, आलगुडे सर,अंबादास झेंडेकर, नारायण कनपुरे, ऊमेश राजुरकर, चकोर मडकर, नारायण झेंडेकर, रुक्मिणी झेंडेकर, पूजा झेंडेकर, राजाभाऊ लाड, सरस्वती लाड, श्रीपाद, लाड सदाशिव, शंकर लाड, शशिकला लाड, नारायण, औंकार रुक्मिणी, रेणुका लाड, शिलाबाई यलिगार, उमेश, योगेश यांच्यासह आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

मल्टिस्टेट प्रकरणी प्रा.सचिन उबाळे यांनी घेतली एसपींची भेट

सोमवारी एसपींच्या उपस्थितीत होणार तपास अधिकाऱ्यांची बैठक

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांचे चेअरमन, संचालक मंडळ यांच्यावर कारवाई करावी यासह ठेवीदारांच्या विविध मागण्यांसाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन उबाळे यांनी ठेवीदारांसह पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेतली. यावेळी मल्टिस्टेट, पतसंस्था प्रकरणातील तपास अधिकाऱ्यांची सोमवारी बैठक घेऊन तपासाबाबत गती वाढवून फरार आरोपींवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन एसपी नवनीत कॉवत यांनी ठेवीदारांना दिले.

बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, साईराम मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, जिजाऊ मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, शुभ कल्याण मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी या (मल्टीस्टेट) को. ऑपरेटीव्ह सोसायटी या दिवाळखोरीत निघाल्या असून जिल्ह्यातील ठेवीदारांचे लाखो रुपये यामध्ये अडकले आहेत. या प्रकरणी स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी ठेवीदारांच्या बाजूने आवाज उठवत उपोषण, आंदोलने करुन हे प्रकरण लावून धरले. यामुळे जिल्हाप्रशासन व पोलिस प्रशासनाने सुरेश कुटे, साईनाथ परभणे, यशवंत कुलकर्णी, बियाणी, यासह काही पतसंस्थांच्या संचालकांना अटक केली. मात्र अजुनही काही आरोपी फरार आहेत. दरम्यान प्रा.उबाळे यांनी गुरुवारी (दि.९) ठेवीदारांसह पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन मल्टिस्टेट प्रकरणाची आतापर्यंतची सर्व माहिती त्यांना सांगितली. या प्रकरणातील तपास अधिकारी विश्वांभर गोल्डे यांनी आजपर्यंत केलेल्या कारवाईची माहिती ठेवीदारांना सांगावी अशी मागणी पोलस अधिक्षकांकडे केली. यावर सोमवारी (दि.१३) तपास अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तपासाची सर्व माहिती सांगण्यात येईल असे आश्वासन पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली असल्याची माहिती प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी दिली. निवेदनात बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, साईराम मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, जिजाऊ मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, शुभ कल्याण मल्टीस्टेट या मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटीवर तात्काळ प्रशासकाची नेमणुक करुन सर्व संस्थेचे विशेष लेखापरिक्षण करुन सर्व ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात याव्यात, ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, साईराम मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, जिजाऊ मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटी, शुभ कल्याण मल्टीस्टेट यासह इतर सर्व संशयास्पद व्यवहार असणाऱ्या मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव संचालक मंडळ व कर्मचारी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तांची चौकशी करावी, ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटीचे उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णी, साईराम मल्टीस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह सोसायटीचे शाहीनाथ परभणे व संचालक मंडळ, राजस्थानी मल्टीस्टेटचे चंदुलाल बियाणी व संचालक मंडळ, शुभकल्याणचे संचालक मंडळ, जिजाऊ मल्टीस्टेटचा मुख्य आरोपी बबन शिंदे तसेच फरार आरोपींना तात्काळ अटक करावी. व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांची चौकशी करून त्यांच्या नावावर असलेल्या प्रॉपर्टी जप्त करावी अशी मागणी पोलिस अधिक्षकांकडे करण्यात आली.

... तर ८ दिवसात प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देतो

प्रदेशाध्यक्ष बदलाची मागणी करणाऱ्यांना जयंत पाटलांचे आव्हान

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचा प्रदेशाध्यक्ष बदलावा अशी मागणी करणाऱ्या पक्षांतर्गत विरोधकांना जयंत पाटील यांनी आव्हान दिले आहे. पुढच्या दोन दिवसात प्रत्येकाने आपल्या वॉर्डात पक्षाला किती मतं दिली त्याचा डेटा द्या, आठ दिवसात स्वतःहून प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देतो असे जयंत पाटील म्हणाले. पक्ष चालवणं हे काही सोपं काम नाही, सगळ्यांना एकत्र घेऊन काम करावे लागले असेही ते म्हणाले. राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष बदलावा अशी मागणी काही कार्यकर्त्यांनी केली. त्यावर जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली.

पदाधिकाऱ्यांच्या मागणीनंतर जयंत पाटील म्हणाले की, पक्ष चालवणं हे काही सोपं काम नाही. जोरदार भाषण करून उपयोग नसतो. डोकं शांत ठेऊन आक्रमक कार्यकर्त्यांसह शांत कार्यकर्त्यांना एक करायचे असते. प्रत्येकाने पुढील २ दिवसांत आपण आपल्या वॉर्डात पक्षाला किती मत मिळवून दिली ते सांगा. त्यानंतर आठ दिवसात राजीनामा देतो. पक्षाला नवीन पदाधिकारी आणि प्रदेशाध्यक्ष द्या अशी मागणी काही नेत्यांनी केली. त्यावर जयंत पाटील म्हणाले की, मी एकटा कितीवेळ काम करायचं?आठ दिवसांचा वेळ द्या स्वत:हून प्रदेशाध्यक्षपद सोडतो. निवडणुकीत बुथवर काम केल्याचा डेटा द्या. कुणी काय काम केलं याची सविस्तर माहिती द्या. त्यानंतर प्रदेशाध्यपदावरुन बाजूला होतो. बोलणे सोपे असते, चांगला माणूस मिळणे अवघड असते, असे ते म्हणाले.

पंकजाताई मुंडे मंत्री झाल्यानंतर प्रथमच परळीत

यशःश्री निवासस्थान गर्दीने फुलले; जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण

परळी वै । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे मंत्री झाल्यानंतर प्रथमच शहरात आगमन झाले,त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यशःश्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निराकरण केले.

ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. मंत्री झाल्यानंतर प्रथमच आल्या तरी कुठलाही गाजावाजा, मोठा सत्कार करू नये अशा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या होत्या. आज सकाळपासूनच यशःश्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन्? वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. परळीकर नागरिकांनी केलेले स्वागत नम्रतापूर्वक स्वीकारून पक्षाने सोपवलेल्या दायित्वाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या. भाजपचे कार्यकर्ते किशोर केंद्रे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते.ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आज त्यांच्या पदमावती भागातील निवासस्थानी जाऊन केंद्रे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.

पान १ वरून...

तांत्रिक अडचणीने हजारो

नोंदणी करण्याकरिता मुदत दिली होती. पोर्टलमधील तांत्रिक अडचणीमुळे हजारो शेतकऱ्यांची नोंदणीच झाली नाही. नोंदणीची वेळ निघून गेल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहे. त्यात शासनाकडून ८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने शेतकऱ्यांना नोंदणी करण्यास वेळ मिळणार आहे. नाफेडने अनेक सोयाबीन खरेदी केंद्र सुरू केले. शेतकऱ्यांनी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी. मोबाइलवर एसएमएस आलेल्या शेतकऱ्यांनीच सोयाबीन विक्रीसाठी केंद्रावर आणावे, अशी सूचना देण्यात आली होती. त्यानुसार शेतकऱ्यांनी अर्ज ऑनलाईन भरले. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची केंद्रांवर सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आली. आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी झाले आहे. उर्वरित शेतकऱ्यांचेही सोयाबीन खरेदी केले जात आहे. मात्र नोंदणी पोर्टलमधील तांत्रिक अडचणीमुळे तब्बल चार हजार शेतकरी सोयाबीन विक्रीपासून वंचित राहिले आहे. शिवाय नाफेडच्या भावात आहे खाजगी भावात नुकसान शेतकऱ्यांचे होत असल्याने नाफेडने खरेदीसाठी मुदत वाढ द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती, त्यानुसार मुदतवाढ मिळाली असली तरी तांत्रिक अडचणी अजूनही तशाच आहेत. शेतकऱ्यांकडे बारदाना नाही, काही शेतकऱ्यांना नोंदणीची प्रक्रियाच माहित नाही. तर काही ठिकाणी नोंदणी होण्यास अडथळा येत आहे.

शिक्षकांच्या पगारीसाठी

म्हटले की, आपल्या इथं शिक्षकांचे या महिन्यातील पगार झाले नाहीत का?, असा प्रश्न अर्थमंत्र्यांनी फोनवरुन संबंधित अधिकाऱ्यांना विचारला. एसीएस फायनान्सने सांगितले की, आपण सगळ्या विभागांना शिक्षकांच्या पगाराचे पैसे उपलब्ध करुन दिले आहेत. ज्या त्या डिपार्टमेंटमध्ये पगाराचे वितरण करताना काही त्रुटी किंवा अंतर्गत प्रश्न असेल तो झाला असेल. त्यामुळे, विभागाने सगळ्यांचे पैसे दिले आहेत ही बाजू आता क्लेअर झाली आहे. आता, सीपीशी बोलतो, एज्युकेशन सचिवांशी बोलून त्यांना सांगतो की, हे असे राहता कामा नये, असेही अजित पवारांनी म्हटले. त्यामुळे, शिक्षकांच्या पगारांचा विषय मार्गी लागला आहे.

धनंजय मुंडेंचा राजीनामा न घेण्यावर

यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड हा मास्टरमाईंड असल्याचा आरोप होत आहे. तर मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा विरोधकांकडून मागितला जात आहे. अशातच पहिल्यांदा अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य करत मौन सोडले आहे. आरोप सगळ्यांवर होतात. पण त्या आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही? हे समोर आल्याशिवाय राजीनामा मागणं योग्य नाही. पण काहीजणांनी होणाऱ्या आरोपांवर व्याकूळ होऊन राजीनामा दिला आहे. धनंजय मुंडे यांचे स्पष्ट मत आहे की, बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात कोणताही संबंध नाही. कोणत्याही एजन्सीकडून चौकशी करा असे जी व्यक्ती ठामपणे सांगते त्यावेळी काम करत असताना दोषी नसतानाही कोणावर अन्याय होता कामा नये, अशी अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. तर अजित पवार पुढे असेही म्हणाले, जो कोणी दोषी असेल. ते सिद्ध झाले तर कारवाई करेन. चौकशी सुरु आहे. आरोपी सापडायला वेळ लागला. महाराष्ट्रात अजिबात या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत. पुरावा नसताना कोणावर आरोप करणं कितपत योग्य आहे? असा सवालही अजित पवार यांनी केला.

वाल्मिक कराडच्या

डोळ्यांना संसर्ग झाल्याची डॉक्टरांनी सांगितले असल्याची माहिती सुत्रांकडून प्राप्त झाली आहे.

धनंजय मुंडे यांनी

यांचे बंधू धनंजय देशमुख आणि मुलगी वैभवी देशमुख सहभागी झाले. या मोर्चात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी भूमिका मांडली. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेत त्यांच्यावर प्रचंड घणाघात केला. त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले. यावेळी मनोज जरांगे म्हणाले, या धनंजय मुंडेने जे प्रयोग सुरु केले आहेत, या धनंजय मुंडेने जे षडयंत्र सुरु केले आहेत, तो जे लोकांना आता सांगतोय की, मोर्चे काढा, आंदोलने करा. हे सर्व धनंजय मुंडे यांचे काम आहे. दुसरं कोणाचे नाही, असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला. धनंजय मुंडे तुमच्या लक्षात येत नाही, तुम्ही जास्त खोलात जात आहात. तुम्ही अशी फूट जर पाडली, संतोष भैय्याच्या पाठिशी उभे न राहता आरोपींच्या पाठिशी उभे राहण्याचे काम तुमच्या लाभार्थी टोळीकडून सुरु केले, यानंतर तुमच्या घरातले कुणी मेलं तर असेच मोर्चे काढायचे का? हा महाराष्ट्र धनंजय मुंडे नेमकं कोणत्या बाजूला घेऊन चालला आहे? आपण मंत्री पदावर आहात. संविधानाची शपथ घेतली आहे. राज्याचा प्रमुख व्यक्ती म्हणून आपण काम करत आहात. तुमच्या लाभार्थ्या गुंड टोळीला तुम्ही राज्यात आंदोलने करायला लावता आणि आरोपींना साथ द्यायला लावता ही धनंजय मुंडेची झालेली दिशा चांगली नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आकाच्या ड्रायव्हरच्या

एक आका आत आहे मात्र बाहेरच्या आका ने याचे उत्तर द्यावे. पोलीस आकाचे ऐकत असतील तर माझी मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, सावधान इंडियामधल्या पोलिसांची इथं नियुक्ती करावी. खरे पोलीस इथं काही करत नाहीत. मी लेखी पत्र देणार आहे. सीआयडी आणि सावधान इंडिया कार्यक्रमातील पोलिसांची आता परळीमध्ये नियुक्ती द्या, असे सुरेश धस म्हणाले. छोट्या आकाला २०२२ मध्ये ईडी नोटीस आली आहे. यावेळी वाल्मिक कराडने कुणाच्या नावावर जमिनी घेतल्या ते सुरेश धस यांनी वाचून दाखवले. वॉचमनच्या नावावर जमीन घेतली आहे. पुण्यात एफ सी रोडवर सुशील पाटील बिल्डर आणि छाजेड त्याचे पार्टनर आहेत. तिथं आकाने ७ शॉप घेतले आहेत. ६०१ ते ६०७ क्रमाकांचे गाळे आकाने घेतले आणि ६०८ दुकान विष्णू चाटे यांच्या बहिणीच्या नावावर आहे. यातील एकाची किंमत ५ कोटी आहे. वाल्मिक आकाच्या नावावर ४ शॉप त्यांच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३ शॉप आणि चाटेच्या नावावर एक म्हणजे ४० कोटींचे शॉप आहेत, असा खळबळजनक आरोप सुरेश धस यांनी केला. पुण्यात मागरपट्टामध्ये एक फ्लॅटची किंमत १५ कोटी रुपये आहेत. तिथं त्यांनी एक मजला पूर्ण विकत घेतला आहे. तो मजला वाल्मिक अण्णाच्या ड्राइवरच्या नावावर आहे. त्याची किंमत ७५ कोटी आहे. त्यामुळे हे सगळे प्रकरण ईडीच्या दरबारात गेले. यावेळी सुरेश धस यांनी वाल्मिकच्या प्रॉपर्टीबाबत तपशीलवार माहिती दिली.

परभणीत लक्ष्मण हाकेंचा

समर्थन तुम्ही करत असून तुम्ही भाजपचे काम करता, असा आरोपही कार्यकर्त्यांनी केला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

महाराष्ट्रात 'या' ११ दिग्गजांनी

सुप्रिया सुळे, नाना पटोले, संदीप क्षीरसागर, बजरंग सोनवणे, सुरेश धस, प्रकाश सोळंके, आंबादाम दानवे यांनी मागितला आहे. नैतिकतेने मुंडेंनी राजीनामा द्यायला हवा होता म्हणत उत्तम जानकरांनी पुरुष वेश्या अशी टीका केली. नैतिकतेच्या आधारावर मंत्री धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होती. या आधी ४-४ मुख्यमंत्र्यांसह कॅबिनेट मंत्र्यांना आरोपांनंतर नैतिकतेतून राजीनामा द्यावा लागला होता. ए.आर. अंतुले यांनी कथित सिमेंट घोटाळ्यात राजीनामा दिला होता. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्यावर मुलीच्या परीक्षेत २ गुण वाढवल्याचा आरोप होता. त्यांनी नैतिकतेतून राजीनामा दिला होता.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५

माजी पं.स.सदस्य लगाडे यांना अज्ञातांकडून मारहाण,अपहरण करण्याची दिली धमकी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सोन्नाथडी येथील माजी पंचायत समिती सदस्य मिलिंद लगाडे वय वर्ष ५५ यांना दि ०८ जानेवारी बुधवार रोजी घळाटवाडी फाट्यावर अज्ञात दोन व्यक्तींनी मिलिंद लगाडे तूच आहेस का तू फार मोठमोठ्या लोकांमध्ये उठतो बसतोस त्यांच्यासोबत राहतोस असे म्हणत गालावर चापटाना व बुक्क्यांनी मारहाण केली व आता मोठ मोठ्या लोकांसोबत राहिलास त्यांच्यासोबत उठला बसलास तर तुझे अपहरण करून घेऊन जाऊ अशी धमकी दिली.या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपी विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.०८ जानेवारी बुधवार रोजी सायंकाळी ६:१० वाजता शेतातून घरी जात असताना घळाटवाडी फाट्याजवळ दोन अज्ञात व्यक्तींनी येऊन त्यापैकी एकाने तू मिलिंद लगाडे आहेस का तू फार माजलास तू मोठाल्या लोकात राहतोस उठतोस बसतोस म्हणून दोन अज्ञात व्यक्तींनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करत अपहरण करण्याची धमकी दिली याबाबत माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अदखलपात्र बी.एन. एस.एस.१७४ अंतर्गत गु.र.नं.१४/२०२५, कलम ११५(२),३५२,३५१(२), ३५१(३),३(५) प्रमाणे दोन अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत १०० दिवसांच्या कामांचे नियोजन सादर

नागरिकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांची संकेतस्थळे अद्ययावत करण्यासाठी सर्व विभागांकडून तात्काळ अधिकृत माहिती उपलब्ध करुन घ्यावी. शासनाकडे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेली माहिती साठविण्यासाठी क्लाऊड सेवेचा उपयोग करावा. तसेच नागरिकांना सर्व योजनांची आणि लाभांची घरपोच सेवा उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नागरिकांना सर्व सेवा सुलभतेने उपलब्ध व्हाव्यात यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे बळकटीकरण करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत येत्या १०० दिवसात करावयाची कामे आणि उपाययोजना याबाबत मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सादरीकरणाद्वारे चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कामगार मंत्री आकाश फुंडकर, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव डॉ.अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल

देवरा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, शासनाकडे मोठ्या प्रमाणावर माहितीचा साठा असून हा वाढत जाणार आहे. विविध विभागांनी माहिती तंत्रज्ञान विभागाला कोणती माहिती द्यावी याबाबत शासन निर्णयाद्वारे स्पष्टता आणावी. या माहितीमुळे नागरिकांना कोणत्याही योजनेचा लाभ मिळवून देणे सहज शक्य होणार असून या माहितीच्या वापराबाबत धोरण तयार करुन तिचा दुरूपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या १०० दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती दिली. नागरिकांना अद्ययावत माहिती उपलब्ध होण्यासाठी संकेतस्थळे अद्ययावत करणे, माहिती जतन करण्यासाठी क्लाऊड सेवेचा उपयोग करणे, डिजीलॉकरच्या माध्यमातून सध्या उपलब्ध असलेल्या २१ सेवा ८० पर्यंत वाढविणे, महाडीबीटीची व्याप्ती वाढविणे, कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण तयार करुन मान्यतेसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवणे, ई-ऑफीस प्रणालीमध्ये अधिक कार्यालयांना सामावून घेणे, मुख्यमंत्री फ्लॅगशीप डॅशबोर्डमध्ये अधिक योजनांचा समावेश करणे, आपले सरकार तक्रार निवारण पोर्टलवरील प्रलंबित प्रकरणे कमी करणे आदी बाबींचा यामध्ये समावेश होता.

खोलेश्वर महाविद्यालयात दर्पण दिनाचे औचित्य साधून वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान अंतर्गत ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

खोलेश्वर महाविद्यालयामध्ये दर्पण दिनाचे औचित्य साधून वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियाना अंतर्गत १ जानेवारी ते १५ जानेवारी वाचन पंधरवाडा च्या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. एन.एस.एस विभाग , प्रसिद्धी विभाग व ग्रंथालयाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली . या ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन दै. लोकमतचे पत्रकार अविनाशजी मुडेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले . या निमित्ताने उद्घाटक म्हणून बोलताना ते म्हणाले की, आजच्या युगामध्ये युवक हे वृत्तपत्रापासून अलग होताना दिसत आहेत तसेच सोशल मीडियाच्या मुळे ग्रंथाचे महत्त्व कमी होत चालले आहे असे नाही त्याला देखील महत्त्वाचे स्थान प्राप्त आहे. वर्तमानपत्र हे एक समाजातील महत्त्वाचे साधन म्हणून

ओळखले जाते. ते पुढे बोलताना म्हणाले की, जीवनात प्रथम शिक्षक नंतर पुस्तक हे दोन महत्त्वाचे घटक आहेत .म्हणून ग्रंथ वाचनाला देखील विद्यार्थ्यांनी महत्त्व दिले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना वृत्तपत्राच्या माध्यमातून देखील उज्वल यश गाठता येते याचे त्यांनी उत्तम उदाहरण देखील सांगितले .

.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून लाभलेले महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य राम कुलकर्णी हे होते. ते याप्रसंगी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की , समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी देखील वृत्तपत्र महत्त्वाचे ठरते .देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटनेची माहिती वृत्तपत्राच्या माध्यमातून आपणास मिळते .त्यामुळे वृत्तपत्र वाचून देखील यश गाठता येते .वृत्तपत्राच्या माध्यमातून ज्ञानात भर पडते. ज्यांना समाजकार्यात आनंदाने काम करायचे आहे त्यांच्यासाठी पत्रकारिता हा एक महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो .पत्रकाराने आपली लेखणी कोणासाठी चालवली पाहिजे हे समजून घेतले पाहिजे समाजातील आवाज उठविण्यासाठी पत्रकारिता असावयास पाहिजे . पुढे बोलताना ते म्हणाले की, नव्या पिढीने ग्रंथालयात बसून ग्रंथाचे वाचन केले पाहिजे .तसेच आपले नाव सुवर्ण अक्षराने लिहायचे असेल तर ग्रंथाचे वाचन केले पाहिजे .ग्रंथ वाचनाने तरुण मुला-मुलींनी वाचन क्षमता वाढवून आपल्या जीवनातील यश गाठले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. व ग्रंथ प्रदर्शनाच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाची प्रस्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . दिपक फुलारी सर यांनी केले तर आभार एन. एस.एस विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ . मानितकुमार वाकळे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले . या कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल डॉ. तुळशीराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथ प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले .या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किल्ले रायगडावर संपन्न होणार 'क्रांतीसुर्य शंभूराजांचा' राज्याभिषेक सोहळा

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांचे जेष्ठ सुपूत्र युवराज संभाजी राजांचा १६ जानेवारी १६८१ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक संपन्न झाला आणि कर्तव्यनिष्ठ शंभूराजे स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून सिंहासनाधिष्टीत झाले.

मागील अनेक वर्षे विस्मरणात गेलेल्या या राज्याभिषेक सोहळ्याला पुनश्च दिव्यत्व प्राप्त करून देण्यासाठी काही मोजके शिवशंभू पाईक एकत्र येत दि. १६ जानेवारी २०१४ रोजी शंभूछत्रपतींच्या या राज्याभिषेक सोहळ्याचा श्री गणेशा केला आणि तो आजही अव्याहत पणे शिवशंभू पाईक तसेच पुरातत्व विभागाच्या सहकार्याने चालू आहे. यंदा राज्याभिषेक सोहळ्याचे दशकपुर्ती महोत्सव, या नमित्ताने एका विशेष संकल्पनेच्या माध्यमातून हा सोहळा साजरा केला जाणार आहे तो म्हणजेच ''क्रांतीसुर्य शंभूराजा''. स्वातंत्र्यलढ्यात आपल्या जिवाची तमा न बाळगता लढा देणाऱ्या क्रांतीकारकांच्या वंशजाच्या हस्ते भारताच्या विविध राज्यातील पवित्र नद्यांच्या जलाभिषेकांने हा सोहळा संपन्न होणार आहे.

मागील दहा वर्षात स्वराज्यातील सरदारांचे वंशंज, समाजातील कर्तृत्ववान महिला, वारकरींच्या भक्ती-शक्ती स्वरूप, रायगडावर वर्षानुवर्ष वास्तव्यास असलेले मावळे,कुस्तीचा फड गाजविणाऱ्या मल्लांचा मर्दानी राजा, शेतकऱ्यांचा पोशिंदा राजा या समाजातील विविध घटकातील मान्यवरांच्या हस्ते हा सोहळा संपन्न होत आहे.

श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती फक्त १६ जानेवारीला रायगडावर संपन्न होणाऱ्या सोहळ्यापुरते मर्यादित नसून या माध्यमातून वर्षभर राज्यातील विविध भागात होणाऱ्या सामाजिक कार्यातही अग्रस्थानी आहे, यामाध्यमातून होणारे रक्तदान शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, पूरपरिस्थित अन्नधान्याचे वाटप, वृक्षलागवड आणि संवर्धन हि सगळी सामाजिक कामे वाखाणण्याजोगी आहेत.

जलाभिषेकांचे मानकरी

१)श्री.किरण जीत सिंग हुतात्मा सरदार भगत सिंग यांचे पुतणे

२)श्री.अँड.भाई सुभाष भगवानराव पाटील क्रांतीसिंह नाना पाटील यांचे नातू

३)श्री. सत्यशिल कमलाकर राजगुरू हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे नातू

४)श्री. सज्जनराव शामराव पाटील स्वातंत्र्य सैनिक गोवा मुक्ती संग्राम १९५५

५)श्री. गौरव किरण नायकवडी क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नातू

६)श्री. दिग्विजय सर्जेराव जेधे स्वातंत्र्यसैनिक देशभक्त केशवराव जिथे यांचे पणतू

७)श्री.संजीव जावळे सशस्त्र क्रांतिकारक सार्वजनिक गणेशोत्सवाचे आद्य संस्थापक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी उर्फ भाऊ लक्ष्मण जावळे यांचे पणतू

दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्नदान आणि शेतकऱ्यास गोदान देऊन बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे शिवसेनेचे शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांच्या वतीने दि ०९ जानेवारी गुरुवार रोजी माजलगाव येथील तुळजाभवानी मंदिरात आरती व अभिषेक करून तसेच मूकबधिर शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्नदान वाटप करून व शेतकऱ्यास हिंदू धर्मातील पवित्र अशा श्रेष्ठदान गोदान याचे दान करून बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला.

या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले , अभिजीत कोंबडे युवा सेना प्रमुख, रामेश्वर काशीद उ. तालुका प्रमुख अमित गिरी, विकास झेटे, विशाल चव्हाण, योगेश उगले,राहुल बावणे,दत्ता क्षीरसागर,सोमेश्वर धारक मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक अशोक थळपती सर तसेच बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त तुकाराम येवले यांनी मनोगत व्यक्त करून बाजीराव चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि दीर्घायुष्य लाभावे यासाठी देवीला साकडे घातले. तसेच थळपती सर यांनी बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करताना शुभेच्छा देऊन बाजीराव चव्हाण यांना दीर्घायुष्य लाभावे अशी मनोकामना केली. माजलगाव मध्ये बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करताना मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

खो-खो स्पर्धेत मुलीच्या गटात जयभवानी विद्यालय विजेता तर शारदा विद्यामंदीर उपविजेता

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात जयभवानी विद्यालय शिवाजीनगरच्या भव्य मैदानावर आयोजित केलेल्या खो-खो स्पर्धेत शिवाजीनगर गढी येथील जयभवानी विद्यालयाच्या मुलीच्या संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले तर गेवराई येथील शारदा विद्यामंदिरचा संघ उपविजेता ठरला. स्पर्धा आयोजक रणवीर पंडित यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चौथा क्रीडा महोत्सव गेवराई तालुक्यात मोठ्या उत्साहात सुरू आहे. क्रीडा महोत्सवाच्या पाचव्या दिवशी

जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी येथे भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये सर्व साखळी सामने झाल्यानंतर जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी विरुद्ध शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर यांच्यात अंतिम सामना झाला. यात जयभवानीच्या संघाने अप्रतिम खेळी करत शिवशारदा पब्लिक स्कूलचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संघात तागड ज्योती, मोहिते राधिका, ठोंबरे अमृता, पवार तनुजा ,शिंदे तेजस्विनी, शिंदे संध्या, मगर ज्ञानेश्वरी, गोंजारे राजेश्वरी, शेजुळ रोहिणी, बोर्ड प्रणाली, जाधव भाग्यश्री, शिंदे कांचन, चौधरी कल्याणी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुख्याध्यापक वसंत राठोड, क्रिडाशिक्षक आडे, गिरी, देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

उपविजेतेपद शिव शारदा पब्लिक स्कूलच्या संघाने पटकावले. संघातील

करांडे संस्कृती, चक्कर कल्याणी, करांडे तनुजा, ननवरे संस्कृती, काळम ज्ञानेश्वरी, शेदरे स्नेहल, राऊत प्रतिज्ञा, तावसकर ऋतुजा, माने ज्ञानेश्वरी, येवले दिशा, चक्कर नेहा, मोमीन अरबाश, मोमीन अशमारा, नाईकवाडे सुहानी यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले.

तृतीय विजेता शिवाजी माध्यमिक विद्यालय मालेगाव संघ ठरला. संघात

बोरकर निशा, गरड पूर्वा, ढोकणे रुचिका, काळे जिविका, खराद प्रियंका, खराद सिद्धी, निंबाळकर अंकिता, बोरकर तेजस्विनी, शेख आलिया, शिंदे रितिका, वायकर अमृता यांचा सहभाग होता.

स्पर्धेचे पंच म्हणून रोहित आडे , अभिजीत हिवाळे, भरत यादव, रोहित घिगे, सिंधू माने, गणेश यादव, नवनाथ चव्हाण, विष्णुपंत घोंगडे, वेदांत काळे, प्रा. बोरवडे, देविदास गिरी, गणपत डोंगरे, विजय जाहेर, विजय अपसिंगेकर यांनी काम पाहिले. सर्व विजेत्यांना आयोजक रणवीर पंडित यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योगेश्वरी महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने नुकतीच ''शाश्वत जीवावरणासाठी सूक्ष्मजीव'' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सेमिनारचे मुख्य संघटक सचिव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर हे होते तर निमंत्रक म्हणून सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिल नरसिंगे यांनी भूमिका पार पाडली. या परिसंवादाचा मुख्य उद्देश सूक्ष्मजीवशास्त्र क्षेत्रातील आधुनिक संशोधन व तंत्रज्ञान याविषयी विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मार्गदर्शन करणे हा होता. या एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष मा.डॉ. सुरेश खुरसाळे यांच्या हस्ते झाले. या राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील विविध राज्यातून एकूण ४७१ शास्त्रज्ञ, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. तसेच नेपाळ येथील दोन प्राध्यापकांनी या परिषदेत सहभाग नोंदविला. उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, उपकेंद्र, धाराशिव येथील प्रभारी संचालक डॉ. प्रशांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. दीक्षित आपल्या व्याख्यानात म्हणाले की, आपण आपली भरभराट करण्याच्या मोहापायी आपण आपली परिसंस्था नष्ट करत आहोत. आपण आपली परिसंस्था टिकवण्यासाठी शाश्वत विकासासाच्या शोधात आहोत. आपण सूक्ष्मजीवांचा वापर मानवी कल्याणासाठी, शाश्वत विकासासाठी केला पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. सी एल. बर्दापूरकर हे होते. मा. बर्दापूरकर यांनी या एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादासाठी सर्व आयोजन समिती व सहभागी प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांना शुभेच्छा दिल्या. तसेच या परिसंवादाच्या निमित्ताने विषयातील अद्ययावत माहिती, संशोधन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे स्वागत संबोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.

व्हि. कानेटकर यांनी केले. यावेळी मंचावर संस्थेचे सहसचिव प्राचार्य भीमाशंकर शेटे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ.आर.व्हि.कुलकर्णी, आय. क्यू.ए. सी. समन्वयक प्रा. डॉ. वाय. एस. हंडीबाग तसेच सर्व व्याख्याते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निमंत्रक प्रा. डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आदित्य कदम व तुषार करपुडे यांनी केले. या राष्ट्रीय परिसंवादात पहिल्या सत्रासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली येथील, लाईफ सायन्स विभागाचे प्राध्यापक डॉ. अरुण खरात यांना आमंत्रित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. अरुण खरात यांनी सूक्ष्मजीवांच्या उपयुक्तते विषयी सविस्तर अशी महत्त्वपूर्ण, अभ्यासपूर्ण माहिती दिली. डॉ. खरात म्हणाले की ज्यावेळी आपण सूक्ष्मजीवांविषयी चर्चा करतो त्यावेळी आपण त्याकडे एक धोका म्हणून पाहतो. सूक्ष्मजीव हे धोकादायक नसून ते मानवी कल्याणासाठी उपयुक्त आहेत. आपल्या आतड्यातील फायदेशिर मयक्रोबायोटा कमी होत चालला आहे. ज्याचा वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. आपल्या चांगल्या आरोग्यासाठी व प्रतिकार क्षमतेसाठी हे सूक्ष्मजीव अतिशय उपकारक आहेत. आपली अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी, दारिद्र्य नष्ट करण्यासाठी, चांगल्या प्रतिकार क्षमातेसाठी सूक्ष्मजीव हे महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. दुसऱ्या सत्रात विज्ञान संस्था, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई येथील प्रा. डॉ. उल्हास पाटील यांनी ''सूक्ष्मजीवांच्या शक्तीचा उपयोग मानवी कल्याणासाठी'''' याविषयावर रोचक पद्धतीने व्याख्यान दिले. तिसऱ्या सत्रात पुणे येथील आय.सी.एम. आर., राष्ट्रीय विषाणू संशोधन संस्थेतील सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ डॉ. सुनील वैद्य यांनी लस प्रतिबंधक रोग याविषयी व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात लस म्हणजे काय, लस संशोधन व निर्मिती, लस काढा प्रकारे कार्य करते, गोवर, गालगुंड व रुबेला या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम याविषयी माहिती सांगितली. शेवटच्या व चौथ्या सत्रात अहमदनगर येथील बायोम टेक्नॉलॉजीज चे सी. ई. ओ. , शास्त्रज्ञ व यशस्वी उद्योजक डॉ. प्रफुल गाडगे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी ''जैव उद्योजकता व स्टार्ट अप संधी'' या विषयावर प्रेरणादायी असे व्याख्यान दिले. तसेच यावेळी राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर्स व मॉडेल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातून आलेल्या वेगवेगळ्या विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी पोस्टर्स व मॉडेल चे अतिशय उत्कृष्टपणे सादरीकरण केले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देण्यात आली. समारोप कार्यक्रम प्रसंगी अंबाजोगाई येथील ख्यातनाम मनोविकास तज्ञ डॉ. राजेश इंगोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी या सेमिनार चे उत्कृष्ठ नियोजन केल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व आयोजक टीमचे अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांनी सातत्याने संशोधक वृत्ती अंगीकृत केली पाहिजे, नवनवीन शोध लावले पाहिजेत असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य भीमाशंकर शेटे हे होते. त्यांनी या राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजन समितीतील सर्व सदस्यांचे कौतुक केले व यापुढे ही विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी अशाप्रकारचे उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. आभार प्रदर्शन प्रा. आदित्य कदम यांनी केले.

पान ६ वरून...

राजमाता जिजाऊ क्रिकेट

व इतर अनेक ठिकाणी आपल्या अष्टपैलू खेळाचे बहारदार प्रदर्शन करून तसेच चौकार व षटकारांची आतिषबाजी करत क्रिकेटचे मैदाने गाजवले आहेत. आष्टी येथे ए पी एल क्रिकेट स्पर्धेत नुमान ला आपल्या संघात घेण्यासाठी अनेकांची ओढाताण सुरू असते. महागडा खेळाडू म्हणून त्याची ख्याती आहे. नुमान शेख याला राजमाता जिजाऊ क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक शेख रहीम सर तसेच हंबर्डे महाविद्यालयाचे क्रीडा विभागाचे प्रा वनगुजरे सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. नुमान शेख यांच्या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अखिल भारतीय जायसवाल

नारायण परमेश्वर जायसवाल (अकोला महाराष्ट्र) यांचा समावेश आहे.

या सर्व मान्यवरांनी केलेल्या सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना जायसवाल महासभेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती राजकिशोर मोदी यांनी दिली आहे. सदरील पुरस्काराचे वितरण रविवार दि १२ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे होणाऱ्या अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महाधिवेशनात देशाचे ऊर्जा मंत्री मा. ना.श्रीपाद नाईक, राज्यमंत्री ना.आशिष जायसवाल तथा अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

अडीच एकरात तैवान पेरूतून घेतलं १४ लाखांचं उत्पन्न

स्पर्धा परीक्षांची तयारी फसली पण गडी खचला नाही

राज्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या अनेक तरुणांसाठी परीक्षेत पास होणं, प्रशासकीय सेवांमध्ये रुजू होणं हे मोठं स्वप्न असतं. या परीक्षेच्या तयारीत वर्षानुवर्ष मेहनत करण्याची धमक दाखवतच तरुण चिकाटीने पुढे जाताना दिसतात. पण परीक्षेत यश न मिळाल्याने खचून जाणारेही तरुण दिसतात. पण धाराशिवच्या भूम तालुक्यातील पाठसावंगीच्या एका उच्चशिक्षित तरुणांनं ३ वर्ष परीक्षेची तयारी फसल्यानंतरही हिंमत दाखवत शेतीत तैवान पेरूची लागवड केली आणि १४ लाख रुपयांचे उत्पन्न कमावत आर्थिक प्रगती साधली आहे.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत पारंपरिक पिकांना फाटा देत या तरुणांना मोठ्या हिमतीने तैवान पेरू सारख्या फळ पिकाची लागवड केली. लालसर गुलाबी दिसणाऱ्या पेरूतून तब्बल ३० टन पेरूचे उत्पन्न मिळवण्यात हा तरुण यशस्वी झालाय. या तरुणाचं परिसरात कौतुक होत आहे.

किती खर्च, किती नफा?

भूम तालुक्यातील बाळासाहेब नाईकिंदे या पदवीधर तरुणाने बार्शी मध्ये तीन वर्ष स्पर्धा परीक्षांची तयारी केली. पण स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळाल्याने त्यांनी शेतीत उतरण्याचं ठरवलं. नोकरीच्या मागे न धावता शेतीची काच धरत २० जुलै २०२३ मध्ये अडीच एकर क्षेत्रावर तैवान पेरूची लागवड बाळासाहेबांनी केली. विशेष म्हणजे पहिलाच वर्षी त्यांना ३० टन पेरूचे उत्पादन मिळालं. त्यातून दहा लाख रुपयांची कमाई त्यांनी केली. चालू वर्षात हे उत्पादन ४० टनांवर गेला असून सध्या या तरुणाच्या तैवान पेरूंना बाजारपेठेत चांगला दर मिळतोय. खर बघित आतापर्यंत बारा लाख रुपयांचे उत्पन्न त्यांनी मिळवला असून पेरूची काढणी झाल्यानंतर आणखी चार लाख रुपयांचे उत्पन्न मिळेल अशी त्यांची अपेक्षा आहे. या अडीच एकर पेरूसाठी एकूण चार लाख रुपये त्यांना खर्च आला. केवळ सात महिन्यांमध्ये हा खर्च वगळून १० लाख रुपयांचा नफा त्यांनी मिळवलाय.

कसं केलं पेरूच्या बागेचं नियोजन?

बाजारपेठेत तैवान पेरूच्या जातीला मिळणारा भाव चांगला असल्याचं लक्षात आल्यानंतर या तरुणाने अडीच एकर क्षेत्रामध्ये हर्टी तैवान पेरूची लागवड केली. या पेरूच्या बागेत योग्य व्यवस्थापन ठेवत भरघोस उत्पन्न त्यांनी मिळवलंय. बागेच्या फवारणीसाठी ट्रॅक्टरचा वापर करत बाळासाहेबांनी संपूर्ण बागेला रासायनिक आणि इतर मिश्र खतांचा वापर करत शेणखतही दिले. योग्य व्यवस्थापन आणि अचूक कालावधीत दर्जेदार पेरूचे उत्पादन मिळवल्याने त्यांना बाजारपेठेतही चांगला फायदा झालाय. केवळ राज्याच्याच बाजारपेठेत नाही तर चेन्नई तिरुपती व हैदराबादच्या मार्केटमध्येही ते पेरू विक्रीसाठी पाठवतात. शेताच्या बांधावर येऊन व्यापारी त्यांच्या पेरूची खरेदी करत असल्याने वाहतूक खर्च कमिशन अशा खर्चांपासून वाचत मोठ्या प्रमाणावर ते नफा मिळवतायत.

भारतातील सर्वात मोठे तांदूळ उत्पादक

भात हे भारतातील प्रमुख पिकांपैकी एक आहे. भारतातील पिकांपैकी एक चतुर्थांश भाग हा तांदूळ पिकानं व्यापला आहे. तांदूळ उत्पादनात भारत जगात अग्रेसर आहे. जगातील इतर अनेक देश प्रामुख्याने भातशेती करतात. ऊस आणि मकानंतर भात जगातील तिसरे सर्वात जास्त लागवड केलेले पीक आहे. तांदळापासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवू शकता. दरम्यान, देशातील कोण कोणत्या राज्यात तांदळाचे सर्वाधिक उत्पादन होते, याबाबतची माहिती पाहुयात. तांदूळ हा भारतीय खाद्यपदार्थातील महत्त्वाचा पदार्थ आहे. व्हिटॅमिन बी, मँगनीज, सेलेनियम, मॅग्नेशियम आणि फायबर पुरेशा प्रमाणात भातामध्ये आढळतात. भारतात तांदळाचे सर्वाधिक उत्पादन होते. देशातील कोणत्या राज्यात तांदळाचे सर्वात जास्त उत्पादन होते, याबाबतची माहिती जाणून घेऊयात.

पश्चिम बंगालमध्ये तांदळाचे सर्वाधिक उत्पादन : छत्तीसगडमध्ये जरी मोठ्या प्रमाणात तांदळाचे उत्पादन होत असले तरी भारतात सर्वाधिक तांदळाचे उत्पादन पश्चिम बंगालमध्ये होते. म्हणजेच भारतात तांदूळ उत्पादनात हे पश्चिम बंगाल हे राज्य आघाडीवर आहे. येथील शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात तांदळाचे उत्पादन घेतात. देशातील एकूण तांदूळ उत्पादनात बंगालचा वाटा १३.६२ टक्के आहे.

सर्वात जास्त उत्पादन करणारी ३ राज्य कोणती? : तांदूळ उत्पादनात अग्रेसर असलेल्या

पहिल्या तीन राज्याबद्दल बोलायचे झाल्यास पश्चिम बंगाल हे पहिल्या क्रमांकावर आहे. तिथे एकूण उत्पादन हे १३.६२ टक्के होते. तर त्याचवेळी, उत्तर प्रदेशमध्ये तांदळाचे उत्पादन हे १२.८१ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. पंजाब तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याचा एकूण वाटा ९.९६ टक्के आहे.

तांदळाचे फायदे आणि पोषक तत्वे

व्हिटॅमिन बी, मँगनीज, सेलेनियम, मॅग्नेशियम आणि फायबर पुरेशा प्रमाणात भातामध्ये आढळतात. हे सर्व पोषक तत्व शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहेत. तसेच भातापासून बनवलेली खिचडी एक चमचा तूप मिसळून खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. तुमचे पोट हलके ठेवण्यास देखील मदत करते. याशिवाय भात खाल्ल्याने अनेक आजारांपासून आराम मिळतो.

कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी बांबू लागवड फायदेशीर

मुंबई : राज्यात बेभरवशाच्या शेतीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे शाश्वत शेती करण्यासाठी राज्य सरकारकडून प्रोत्साहन दिले जात असून, राज्यात मोठ्या प्रमाणात बांबू लागवड व्हावी, यासाठी प्रयत्न केले जात आहे. राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना बांबू लागवडीस प्रोत्साहित करण्यासाठी तसेच बांबू लागवडीबाबत वेळोवेळी आढावा घेता यावा. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एका टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे.

बांबू हे कमी पाण्यात वाढणारे तसेच जास्त प्रमाणात कार्बन शोषून घेणारे पीक आहे. वातावरणीय बदलामुळे कोरडवाहू शेती धोक्यात आली असून, पिकांच्या उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. विदर्भ व मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये वारंवार पडणारा दुष्काळ व अवकाळी पाऊस अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडतो.

अशा परिस्थितीत बांबू शेती शेतकऱ्यांसाठी वरदान ठरू शकते. राज्य सरकारकडून स्थापन करण्यात आलेल्या या टास्क फोर्समध्ये

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा देखील समावेश असणार आहे. राज्यामध्ये बांबू लागवडीस प्रोत्साहन देण्याबाबत टास्क फोर्स विचार करील व एक कालबध्द कार्यक्रम तयार करून त्याची संबंधित यंत्रणांमार्फत अंमलबजावणी करेल. या धर्तीवर हे टास्क फोर्स काम करणार आहे.

तीन महिन्यातून एकदा बैठक

राज्य सरकारच्या या टास्क फोर्सच्या बैठकीसाठी निमंत्रित म्हणून आवश्यकतेनुसार विविध अशासकीय संस्था, कंपन्या यांच्या प्रतिनिधींना तसेच तज्ज्ञ व्यक्तींना बोलविले जाणार असून, टास्क फोर्सची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा आयोजित करण्यात येणार आहे. असे राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यभर अंमलबजावणी

बांबू शेती व त्यावर आधारित प्रक्रिया उद्योगाला चालना दिल्यास आदिवासी परिसरातील स्थलांतर थांबेल. स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. बांबू लागवडीमुळे आदिवासी भागातील अर्थचक्र बदलू शकते. राज्यात प्रायोगिक तत्त्वावर नंदुरबार जिल्ह्यात बांबू लागवडीबाबतचा उपक्रम राबविला जात आहे. त्यानंतर याची अंमलबजावणी राज्यात करण्यात येणार आहे. बांबू लागवड उपक्रमाबाबत तज्ञांची समिती गठित करण्यात यावी. या समितीने अहवाल सादर करावा, असे निर्देशही सरकारच्या वतीने अधिकऱ्यांना देण्यात आले आहेत.

अळू लागवड तंत्रज्ञान

अळू हे उष्ण कटिबंधातील एक महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे. भारतामध्ये प्रामुख्याने दक्षिण आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये हे पीक घेतले जाते. उत्तर भारतात अळूच्या कंदांना'आरवी' असे म्हणतात. आळू या भाजीपाला पिकाचे उगमस्थान भारत - मलाया यामधील प्रदेश असून तेथून त्याचा प्रसार आग्नेय आशिया, चीन, जपान आणि पॅसिफिक बेटात झाला. हवामान : आळूला उष्ण आणि दमट हवामान मानवते, कडाक्याच्या थंडीत आळूची वाढ खुंटते. आळूच्या लागवडीसाठी सरासरी २१ अंश सेल्सिअस तापमान असावे.

जमीन : रेताड आणि भुसभुशीत जमिनीत आळू चांगला फोफावतो आळूच्या योग्य वाढीसाठी जमिनीचा आम्ल - विम्ल निर्देशांक ५.५ ते ७ इतका असावा. तरीपण आळू हे पीक चोपण, खारपत जमिनीत तसेच सांडपाण्याच्या जागेतसुद्धा पानांच्या उत्पादनासाठी घेता येते.

आळूच्या जाती : आळूच्या स्थानिक जातींची लागवड बऱ्याच ठिकाणी केली जाते. उत्तर भारतात फैजाबादी, लहरा, देशी, बंडा या स्थानिक जाती लोकप्रिय आहेत. तर महारष्ट्रात काळ्या देठाचा लहान ते मध्यम पानांचा आळू चांगला समजला जातो. पंजाबमध्ये एस - ३, एस -११ या जातींची लागवड केली जाते आळूची व्यापारी तत्त्वावर लागवड करण्यासाठी अधिक उत्पादन देणाऱ्या आळूच्या जाती संशोधन करून विकसित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी कन्दया सी ७, सी ९, सी १३५. सी -१४९, सी २६६ तसेच पंचमुखी आणि सतमुखी या जाती त्यांच्या कंदांची आणि पानांची भाजी करण्यासाठी वापरतात. महारष्ट्रात दापोली -१ ही जात आळूच्या पानांपासून वड्या तयार करण्यासाठी वापरतात.

आस्वाद आळू : पानांमध्ये कॅल्शियम ऑक्झेलेट रॅफाईडसचे प्रमाण कमी असते त्यामुळे घसा खवखवत नाही. वड्या बनवताना तेल कमी

लागते. पीठ कमी लावल्यानंतरही वड्या जास्त खुसखुशीत व चविष्ट लागतात. ज्याप्रमाणे पॅटिस, मूगवडा, भजी खाल्ली जातात त्यापेक्षाही अधिक चविष्ट या वड्या लागतात. म्हणून याला आस्वाद आळू असे नाव दिले आहे. प्रत्येकाने या आळूचा एकदा तर आस्वाद घ्यावा यासाठी आपल्या परसात १०० कंद तरी लावावेत. इतर पदार्थांसारख्या या आळूच्या वड्या लवकर खराब होत नाहीत. आळूची लागवड करून गृहीणींना व उद्योजकांना फार मोठे आर्थिक दालन खुले होणार आहे.

अभिवृद्धी : आळूच्या लागवडीसाठी कोंब फुटलेले आणि निवडक कंद वापरावे. हेक्टरी ८०० १००० किलो बेणे लागते. बेणे लागवडीपूर्वी जर्मिनेटर १ लि. आणि प्रोटेक्टंट १ किलोचे १०० लि. पाण्यात बॅलरमध्ये द्रावण तयार करून त्यामध्ये कंद बुडवून लावावेत.

हंगाम आणि लागवड पद्धती : जमीन नांगराने १५ ते २० सेंटिमीटर खोल नांगरून ढेकळे फोडून भुसभुशीत करावी. जमीन तयार करताना हेक्टरी २५ ते ३० टन शेणखत किंवा कंपोस्ट खत आणि २०० किलो कल्पतरू सेंद्रिय खत द्यावे. आळूची लागवड ही फेब्रुवारी - मार्च किंवा जून - जुलैमध्ये सरी - वरंबा पद्धतीने करतात. ४५ बाय ३० सेंमी अंतरावर ६ बाय ८ सेमी खोल लागवड करावी.

खते आणि पाणी व्यवस्थापन : अधिक उत्पादनासाठी हेक्टरी ५० - ६० गाड्या कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी द्यावे. आळूच्या पिकाला हेक्टरी १०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे. नत्र २ - ३ हप्त्यांत विभागून द्यावे. लागवड पूर्ण झाल्यावर एक हलके पाणी द्यावे. नंतर नियमित पाणी द्यावे, पण वाफ्यात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा मूळकूज रोगाची संभावना राहते. उन्हाळ्यात १० -१२ दिवसांच्या अंतराने आणि हिवाळ्यात १८ -२० दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. महत्त्वाच्या किडी, रोग आणि त्याचे नियंत्रण : आळू पिकावर काही वेळा पाने कुरतडणारी आळी आणि मावा किडीचा प्रादुर्भाव होतो. त्यांच्या नियंत्रणासाठी थायोडान ०.२% प्रमाणे किंवा मॅलॅथिआन ०.१ प्रमाणे फवारणी करावी. या पिकामध्ये हुमणी किंवा वाळवीचा उपद्रव आढळल्यास क्लोरोपायरीफॉस या कीटकनाशकाचा जमिनीतून वापर करावा. आळू पिकावर फारसे रोग पडत नाहीत. काही वेळा करपा रोगाचा पावसाळ्यात प्रादुर्भाव होतो. त्यासाठी रोगट पाने काढून टाकावी आणि १% बोर्डो मिश्रण फवारावे.

फवारणी :- १) पहिली फवारणी : (कोंब फुटल्यानंतर १० ते १५ दिवसांनी) : जर्मिनेटर २५० मिली.+ थ्राईवर २५० मिली. + क्राँपशाईनर २५० मिली.+ प्रोटेक्टंट २५० ग्रॅम + प्रिझम १०० मिली. + हर्मोनी १०० मिली + १०० लि.पाणी. २) दुसरी फवारणी : (पीक १ महिन्याचे असताना) : जर्मिनेटर ३५० ते ४०० मिली.+ थ्राईवर ५०० मिली. + क्राँपशाईनर ५०० मिली.+ प्रोटेक्टंट ५०० ग्रॅम + प्रिझम २५० मिली. + हार्मोनी २०० मिली + १५० लि.पाणी. ३) तिसरी फवारणी : (पीक दीड महिन्यासे असताना) :जर्मिनेटर ५०० ते ६०० मिली. + थ्राईवर ७५० मिली. + क्राँपशाईनर ७५० मिली.+ राईपनर २५० मिली. + प्रोटेक्टंट ७५० ग्रॅम + न्युट्राटोन ५०० मिली + हार्मोनी ३०० मिली + २०० लि.पाणी. ४) चौथी फवारणी : (पानांची काढणी चालू झाल्यानंतर दर १५ दिवसांनी): जर्मिनेटर ७५० मिली + थ्राईवर १ लि. + क्राँपशाईनर १ लि. + राईपनर ५०० मिली + प्रिझम ५०० मिली + प्रोटेक्टंट १ किलो + न्युट्राटोन ५०० मिली + हार्मोनी ४०० मिली + २५० लि. पाणी. वरीलप्रमाणे सतत पाने मिळण्यासाठी कल्पतरू व गांडूळ खत, जमीन हलक्या असल्यास वरील खतांबरोबर काही प्रमणात रासायनिक खत २ ते ३ महिन्यांनी एकदा द्यावे. तसेच महिन्यातून १ ते २ वेळा जरुरीप्रमाणे सप्तामृताची फवारणी करावी. आळूची पाने लागवडीनंतर १.५ ते २ महिन्यांतच काढायला येतात. पाने देठासह कापून गड्ड्या बांधून विक्रीला पाठवावीत. एकदा केलेल्या लागवडीपासून १.५ ते २ वर्षे पाने मिळत राहतात. कंदांचे हेक्टरी २० - ३० टन उत्पादन मिळते. काढणीनंतर हे कंद ५ - ६ दिवस सावलीत पसरून वाळवावेत. नंतर नासके कंद काढून टाकावे आणि निवडक चांगले कंद पोत्यात किंवा करंड्यात भरून विक्रीला पाठवावेत.

दिन विशेष

जागतिक दिवस
जागतिक हिंदी दिवस

महत्वाच्या घटना

१६६६ : सुरत लुटून शिवाजीमहाराज राजगडाकडे निघाले.
१७३० : पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत शनिवारवाड्याच्या बांधकामास सुरुवात झाली.
१८०६ : केपटाऊन येथे स्थायिक असलेले डच वसाहतवादी ब्रिटिशांना शरण गेले.
१८१० : नेपोलियन बोनापार्टने जोसेफाइन या आपल्या पहिल्या पत्नीला घटस्फोट दिला.
१८३९ : पहिल्यांदा भारताचा चहा इंग्लंड ला पोहचला.
१८६३ : चार्ल्स पिअर्सन याच्या आराखड्यानुसार रचना केलेल्या ७ किमी लांबीच्या व सात स्थानके असलेल्या भुयारी रेल्वेची लंडनमध्ये सुरूवात झाली.
१८७० : जॉन डी. रॉकफेलर याने 'स्टँडर्ड ऑईल' कंपनीची स्थापना केली.
१८७० : बॉम्बे, बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे या ब्रिटिशकालीन रेल्वे कंपनीच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले चर्चगेट रेल्वे स्थानक सुरू झाले. या स्थानकावर फक्त एक फलाट होता.
१८८४ : ब्रिटन च्या रसायन शास्त्रज्ञ जोज़फ एस्पीडियन यांनी पहिल्यांदा सिमेंट बनविले.
१९२० : पहिले महायुद्ध व्हर्सायचा तह अस्तित्त्वात आल्याने पहिले महायुद्ध संपले.
१९२६ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ 'श्रद्धानंद' साप्ताहिक मुंबईत सुरू केले.
१९२९ : जगात अमाप लोकप्रियता मिळालेले 'द ॲडव्हेंचर्स ऑफ टिनटिन' हे कॉमिक प्रथमच प्रसिद्ध झाले.
१९६६ : भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.
१९७२ : पाकिस्तानमधील तुरुंगात ९ महिने काढल्यानंतर शेख मुजीबूर रहमान हे राष्ट्राध्यक्ष म्हणून नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या बांगला देश मधे परतले.
२००६ : माजी प्रधान मंत्री मनमोहन सिंग यांनी १० जानेवारी ला जागतिक हिंदी दिवस म्हणनू साजरे करण्याची घोषणा केली.
२००८ : टाटा कंपनी ने जगातील सर्वात स्वस्त कार नॅनो कार ला बाजारात आणण्यासाठी सुरुवात केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : बाजीराव पेशवे (दुसरे) (मृत्यू: २८ जानेवारी १८५१ ब्रम्हावर्त)
१८९६ : नरहर विष्णू तथा 'काकासाहेब' गाडगीळ स्वातंत्र्यसैनिक, लेखक, वक्ते, राजकीय नेते, केंद्रीय मंत्री आणि पंजाबचे राज्यपाल (मृत्यू: १२ जानेवारी १९६६)
१९०० : मारोतराव सांबशिव कन्नमवार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री (२० नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३) (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९०१ : इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा पनवेल येथे जन्म
१९१९ : संस्कुत अभ्यासक आणि रामायणातील शाप आणि वर, महाभारतातील कुमारसंभव या ग्रंथांचे लेखक श्री. र. भिडे यांचा जन्म.
१९२७ : तमिळ अभिनेते शिवाजी गणेशन यांचा जन्म.
१९३७ : भातीय राजनीती तज्ञ मुरली देवड़ा यांचा जन्म.
१९४० : के. जे. येसूदास पार्श्वगायक व संगीतकार
१९४९ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट निर्माते अल्लू अरविंद यांचा जन्म.
१९५० : आदिवासींसाठी आयुष्य वेचणारया नाजुबाई गावित यांचा जन्म.
१९७१ : प्रसिद्ध बासरी वादक राकेश चौरसिया यांचा जन्म.
१९७४ : हृतिक रोशन सिनेकलाकार
१९८४ : भारतीय अभिनेत्री कल्कि कोचेलिन यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६९३ : कोलकत्याचे निर्माते म्हणून ओळखले जाणारे जाब चारनाक यांचे निधन.
१७६० : दत्ताजी शिंदे पानिपतच्या पहिल्या संग्रामातील रणवीर (जन्म: १७२३)
१७७८ : कार्ल लिनिअस स्वीडीश वनस्पतीतज्ञ, वनस्पतींच्या दुहेरी नामकरणाची आंतरराष्ट्रीय पद्धत त्याने विकसित केली. ही पद्धत त्याला इतकी आवडली की त्याने स्वत:चेही नाव बदलून कॅरोलस लिनिअस असे केले. (जन्म: २३ मे १७०७)
१९६९ : उत्तर प्रदेश चे माजी मुख्यमंत्री संपूर्णानंद यांचे निधन.
१९९४ : ला प्रसिद्ध लेखक गिरिजाकुमार माथुर यांचे निधन.
१९९९ : आचार्य श्रीपाद कृष्ण केळकर स्वातंत्र्य सैनिक व समाजवादी विचारवंत
२००२ : पं. चिंतामणी रघुनाथ तथा सी. आर. व्यास ख्यालगायक, गुरु व बंदिशकार (जन्म: ९ नोव्हेंबर १९२४)

विद्राव्यखते देण्यासाठी करा फर्टिगेशन आणि फवारणीचा वापर

पिकांच्या वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्यांसोबत काही सूक्ष्म अन्नद्रव्यांची आवश्यकता असते. परंतु सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा करताना योग्य पद्धतीने पिकाना करणे खूप गरजेचे असते. खते देण्यासाठी शेतकरी बंधू वेगवेगळ्या पर्यायांचा वापर करतात. परंतु यामध्ये विद्राव्य खते देण्यासाठी फर्टिगेशन आणि पिकांवर विद्राव्य खतांची फवारणी हे दोन पर्याय खूप महत्त्वपूर्ण ठरतात.

विद्राव्य खतांसाठी फवारणीचा वापर आणि फायदे

पाण्यामध्ये विद्राव्य खतांचा वापर फवारणीसाठी देखील करता येतो. जर आपण एकंदरीत पिकांच्या उत्पादन क्षमतेचा विचार केला तर पानामध्ये असलेले जी काही अन्नद्रव्यांची पातळी आहे. त्यावर पिकाची उत्पादनक्षमता ठरते.

त्यासाठी पिकाच्या पानांमधील अन्नद्रव्यांची पातळी संतुलित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारी महत्त्वाचे अन्नद्रव्य संतुलित प्रमाणात पिकाच्या वाढीच्या अवस्थेमध्ये गरजेनुसार मिळणे गरजेचे आहे.

रुई पिंपळा येथे गहिनीनाथ यात्रेनिमित्त रंगल्या जंगी कुस्तीच्या दंगली

महाराष्ट्र केसरी पै.सय्यद चाऊस विशेष यांची उपस्थिती | **जुने महाराष्ट्र केसरी शिवाजीराव केकान यांची उपस्तिथी** | **सावित्रीच्या लेकीच्या कुस्तीने उपस्थितांचे मन वेधले** | **मराठवाड्यातील जवळपास ७०० ते ८०० पैलवानांनी घेतला सहभाग**

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे सुरेख नियोजन करण्यात आले होते. यावेळी भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून रुई पिंपळा येथे प्रथा जपली जात आहे. याहीवर्षी देखील मोठ्या उत्साहात महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत कुस्त्यांच्या दंगली पार पडल्या आहेत. या विशेष कुस्ती सामने कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. केशवदादा आंधळे साहेब, महाराष्ट्र केसरी पै.श्री. शिवाजीराव केकान, बीड जिल्हा कुस्तीगीर व मल्ल संघाचे उपाध्यक्ष श्री. शिवशंकर अण्णा कराड, तसेच जेष्ठ उस्ताद श्री. बाळूभाऊ आवारे साहेब, माजी सरपंच श्री. शंकरराव आंधळे, माजी क्रीडा शिक्षक श्री. मधुकर धस सर, प्रशासकीय अधिकारी श्री. शैलेश आंधळे, जेष्ठ मुकादम श्री. कांताबापू आंधळे, जेष्ठ वकील . श्री. आबासाहेब आंधळे, जेष्ठ वकील श्री. प्रभाकर आंधळे, पै. महादेव मुजमुले, ई प्रमुख उपस्तिथी होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, रुई पिंपळा येथे तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये

पहिल्या दिवशी संदल कार्यक्रम पार पडला तर दुसऱ्या दिवशी गहिनीनाथाच्या दर्शनासाठी हजारो भाविक भक्तांची गर्दी केली होती. या यात्रा उत्सवात विविध खेळण्याच्या दुकाना व आकाश पाळणे विविध प्रकारचे मोठमोठ्या दुकाणा आसतात राजी कला मंडळ असे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच तिसऱ्या दिवशी भव्य कुस्त्यांचे आयोजन महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत

केले होते. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींच्या कुस्त्या पार पडल्या. यावर्षी मराठवाड्यातून आलेल्या नामांकित कुस्तीगिरांमुळे कुस्तीशौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी कुस्त्या ठरल्या. यामध्ये मुलींच्या कुस्तीने उपस्थित त्यांचे मन वेधले होते. कुस्तीची सुरुवात १० रु पासून ते १७ हजार रुपये पर्यंत बक्षीस देण्यात आले आहे. आनंदाच्या वातावरणात कुस्त्या पार पडल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील पैलवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेवटी नामांकित कुस्तीपटू यांच्या आकर्षक कुस्त्या घेण्यात आल्या आणि शेवटी विजयी ठरलेल्या कुस्तीपटूला मान्यवरांच्या हस्ते नगदी १७ हजार रुपये देण्यात आले आहे. यावेळी रुई पिंपळा सह पंचक्रोशीतील कुस्तीशौकिनांनी कुस्त्याचा आनंद घेतला आहे. गहिनीनाथ यात्रेचे चोख व सुरेख नियोजन रुईचे युवा सरपंच मयुरशेट आंधळे व रुई ग्रामस्थ आणि गहिनीनाथ यात्रा उत्सव समितीने माजी आमदार केशवराव आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव आंधळे, शंकरराव आंधळे, माजी सरपंच संजयभाऊ आंधळे, यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. शेवटी परिसरातील नावजलेले कुस्ती वस्ताद यांना समितीच्या वतीने मानधन देऊन सत्कार करुन गौरव करण्यात आला आहे. या कुस्ती सामने कार्यक्रमसाठी विशेष करून गावातील तरुण मंडळी व यात्रा उत्सव समितीने खुप परिश्रम घेतले. याबद्दल सगळयात शेवटी सरपंच श्री. मयूरशेट आंधळे यांनी पोलिस प्रशासन कर्मचारी, यात्रा समितीचे पदाधिकारी, विश्वस्त,व सर्व टीम चा सत्कार करुन आभार मानले. व पुढील वर्षीचा कार्यक्रम याही पेक्षा मोठा करु असे आश्वासन दिले.

वडीगोद्रीत १३८ रक्तदात्यांचे रक्तदान

अंबड। प्रतिनिधी

तालुक्यातील वडीगोद्री येथील श्री गुरुदेव विद्या मंदिर या शाळेत विवेकानंद शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक शिक्षण महर्षी कै.पंढरीनाथ पाटील शिसोदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात १३८ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतावादी कार्यास हातभार लावला आहे.या शिबिरात प्रारंभी कै.पंढरीनाथ पाटील शिसोदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कै.पंढरीनाथ शिसोदे यांच्या ३८ व्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान करून कृतीयुक्त पुण्यतिथी साजरी केली.या शाळेत शिक्षण घेतलेल्या पंचक्रोशीतील आजी माजी विद्यार्थ्यांसह पालकांनी रक्तदान करून हा स्तुत्य उपक्रम राबविला.या सामाजिक कामासाठी परिसरातील तरूणांनी सामाजिक बांधिलकी समजून रक्तदान करून गरजूंना जीवन दान देण्याच्या उद्देशाने रक्तदानाचे काम केले.या रक्तदान शिबिराचे संयोजन सहशिक्षक आर.व्ही.छल्लारे यांनी केले होते. सध्या विविध शस्त्रक्रिया,कर्करोग,थँलसेलिया अशा विविध आजारावरील उपचारांमध्ये रक्ताची मोठी गरज भासत आहे.यावेळी दत्ताजी भाले रक्तकेंद्र यांच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले.याला युवक व महिलांनी चांगला प्रतिसाद दिला.या रक्तदान शिबिरास शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, तरुण, पंचक्रोशीतील गावकरी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर यांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली महत्वपूर्ण सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी प्राचार्य आर.के.माळी, पर्यवेक्षक जे. डब्ल्यू.दांडगे, मुंढे सर, जी.आर.गावडे यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी,पंचकृषीतील समस्त गावकरी यांनी सहकार्य केले.यावेळी दत्ताजी भाले रक्तपेढी यांच्यावतीने रक्तदात्याना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.या रक्तपेढीचे वरिष्ठ तंत्रज्ञ अजित काळे, तंत्रज्ञ वामन कांबळे, जनसंपर्क अधिकारी कृष्णा कुलकर्णी, असिस्टंट राधा पठाडे, नर्स आशा आगलावे,सुनिता पगारे,सहाय्यक सखुबाई जाधव,चालक गणेश देवाडिगा यांनी सहकार्य केले.

जीवनात बदल घडविणारे ग्रंथ आणि ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार आहे –गादेकर

जयभवानीत महाविद्यालयात एक दिवसीय आभासी कार्यशाळेचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य विकास आयोजीत 'वाचन अभिरुची वाढीस लागण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका ' एक दिवसीय आभासी कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. 'वाचन अभिरुची वाढीस लागण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका' या एक दिवसीय आभासी कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी यांनी केले.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई येथील ग्रंथपाल, डॉ. पांडुरंग चंद्रकांत गादेकर हे होते तर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले कि, आजच्या धकाधकीच्या जीवनात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या दुनियेत आजचा युवक गुंतल्यामुळे वाचनाकडे नव्या पिढीचे लक्ष नाही. सखोल विचारातूनच एकरूप समाज निर्माण होत असतो आणि सखोल विचार करण्याची सवय चांगल्या वाचनातूनच तयार होते. तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा, धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असा संदेश त्यांनी दिला. या कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी केले. प्रास्ताविकात सकस आणि समृद्ध वाचनाने आपलेही जीवन समृद्ध होते म्हणून भरपूर पुस्तके वाचा, ही पुस्तकच तुम्हाला आत्मविश्वास देतील जगण्याचं आणि संकटांना सामोरे जाण्याचं असे त्यांनी सांगितले. वाचन अभिरुची वाढीस लागण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका स्पष्ट केली तसेच प्राध्यापक, विद्यार्थी, वाचक यांच्यासाठी ग्रंथाल्याद्वारे राबविण्यात येणारे विविध उपक्रम या विषयी थोडक्यात माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना ग्रंथपाल, डॉ. पांडुरंग चंद्रकांत गादेकर यांनी ग्रंथालय हि सामाजिक संस्था आहे. जीवनात बदल घडविणारे, अवगुणांचे सगुणात रूपांतर करणारे, विनाशापासून वाचविणारे असे ते ग्रंथ आणि ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार आहे असे ते म्हणाले. 'वाचाल तर वाचाल' अशी सुभाषिते आपण अनेकदा वापरतो. प्रत्यक्षात मुले, पालक आणि शिक्षकांमधील वाचनाची सवय कमी होत आहे. निरनिराळी पुस्तके वाचनामुळे बुद्धी, मन यांचा विकास होतो आणि ज्ञानात वृद्धी होते. बालमनावर वाचनाचे संस्कार झाले पाहिजेत असे ते म्हणाले. आत्ताची मुले सलग पानभर सुद्धा वाचण्याची तसदी घेत नाहीत.चित्रांच्या मार्फत दोन-दोन ओळींची माहिती संकलित केलेली कार्टून्स त्यांना जास्त आवडतात. कथा, कादंबरी, वैचारिक पुस्तके, थोरांची चरित्रे, कवितांचा संग्रह यागोष्टी तर त्यांच्या आजूबाजूला फिरकत सुद्धा नाहीत म्हणून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी जोपासण्याकरिता केवळ उपदेशात्मक, बौद्धिक पुस्तके महत्त्वाची नाहीत तर रंजनात्मक, क्रियात्मक पुस्तके निवडून वाचायला द्यावीत. मात्र आज वाचनासाठी अनेक अत्याधुनिक साधने हातात उपलब्ध असूनही तरुण पिढी वाचनापासून दूर जात आहे. टीव्ही, मोबाईलच्या आहारी जाऊन व्हॉट्सऍप वेगवेगळे गेम्स आणि इंटरनेटवर वेळ वाया घालवत असल्याचे आजचे चित्र आहे. त्यांना वाचनासाठी वेळ उपलब्ध नसतो. नव्या माध्यमांच्या आगमनानं वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे. तरूणांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांना वाचनाचे महत्त्व कळावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्राचार्य सोमनाथ घाडगे म्हणाले कि आजचे युग हे डिजिटल युग आहे. नव्या माध्यमांच्या आगमनानं वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे. तरूणांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांना वाचनाचे महत्त्व कळावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. वाचन संस्कृती हि काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपली वाचनाची आवड जोपासली पाहिजे रोज एक तरी पान वाचले पाहिजे असे विद्यार्थ्याला आव्हान केले. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी केले तर आभार बीए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. दिव्या घुमरे हिने मानले. या कार्यशाळेला प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी तसेच वाचकांनी आपला सहभाग नोंदवला.

उच्चभ्रु सोसायटीमध्ये कुंटणखान्यावर छापा

३ पुरुषांसह कुंटणखाना चालक महिला अटक; तीन पिडीत महिलांची सुटका

जालना। प्रतिनिधी

जालना ते अंबड जाणाऱ्या रोडलगत असलेल्या यशवंतनगर पाटीजवळील उच्चभ्रू सोसायटीमध्ये एका घरात एक महिला कुंटणखाना चालवित असल्याची माहीती प्राप्त झाल्याने त्यांचेवर कारवाई करणे साठी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी सुचना दिल्या होत्या.

त्या अनुशंगाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजी यशवंतनगर पाटीजवळील उच्चभ्रु सोसायटीमध्ये किरायाणे घेतलेल्या एका घरात एक महिला रा. सतकरनगर जालना हि तीच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरुन स्त्रीयांना आणून वेश्या व्यवसाय करीत असल्याची माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा टाकुन त्या ठिकाणी कुंटणखाना चालविणारी महिला नश वय ४० वर्षे, रा. सतकरनगर जालना, तीन पिडीत महिला, तीन पुरुष असे मिळुन आले असुन त्यांचे ताब्यातुन एकुण ७४०२५/- रु. किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेऊन कुंटनखाना चालविणारी महिला वय ४० वर्षे, तेथे आढळुन आली तसेच पुरुष आरोपी नामे २) सचिन सुभाष जाधव वय ३४ वर्षे, रा. नुतन वसाहत जालना, ३) बाबुलाल खिमाराम चौधरी वय २५ वर्षे, रा. बालोत्रा ता.जि. बालोत्रा राज्य राजस्थान ह.मु. शहागंज जि.छत्रपती संभाजीनगर व ४) सचिन अंकुश खोमणे वय २४ वर्षे, रा. चिंचोली मच्छींद्र ता. घनसावंगी, जि.जालना यांचे विरुध्द सहायक पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन तालुका जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन तीन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व प्रशिक्षणाची पोलीस अधिक्षक श्री सिध्दार्थ बारवाल, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, रामप्रसाद पव्हरे, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, फुलचंद गव्हाणे, कैलास खाडे, सुधिर वाघमारे, इर्शाद पटेल, सतिष श्रीवास, सोपान क्षिरसागर, रमेश काळे, कविता काकस, सत्यभामा काकडे सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

हिंदू युवा वाहिनीच्या जिल्हा संयोजकपदी संदिप वाकडे

हिंगोली। प्रतिनिधी

जिल्ह्यात हिंदू यूवा वाहिनीची शाखा स्थापन करण्यात आली असुन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रही देण्यात आले. महाराष्ट्र राज्य प्रभारी हिंदु युवा वाहिनी सुनील सिंह आणि वरिष्ठ अधिकारी आशिषबाजपेयी यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. सहप्रभारी गोपालनाथ महाराज, जिल्हा प्रभारी पंजाबराव गव्हाणकर, जिल्हा संयोजक संदीप वाकडे, संघटन महामंत्री ऋषिकेश देशमुख, जिल्हाध्यक्ष राहुल ओमप्रकाश मेने, जिल्हा उपाध्यक्ष मसाराव गणपतराव करे, जिल्हा माध्यम प्रमुख गोविंद देवरात बेंद्रे,कायदेशीर सल्लागार अधिवक्ता रंगनाथ देशमुखे, शिवाजी ऊघडे, आतिश गजानन दुभाषे, रोहिणीताई अलमुवार, शेरसिंग बावरी, शशिकांत देशमुख, विष्णू तावरे यांचा समावेश आहे.

जालन्यात महाचिंतनी देशव्यापी शिबिर

जालना। प्रतिनिधी

जालना मागील २७ वर्षापासून महानुभव पंथाद्वारे भरविण्यात येणारे महाचिंतनी देशव्यापी शिबिर यंदा जालना शहरात दिनांक ९, १० व ११ जानेवारी दरम्यान भरविण्यात येणार आहे. शहरातील ज्ञान संजीवनी कॅम्पस, राजपूतवाडी, सामनगाव रोड येथेही शिबीर होणार असून याबाबत पत्रकार परिषदेत स्वागताध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर, बाभुळगावकर शास्त्री महाराज आणि डॉक्टर बळीराम बागल यांनी माहिती दिली.

२८ वे देशव्यापी महाचिंतनी शिबिर यावर्षी जालना शहरात भरविण्यात येत असून या कार्यक्रमाच्या समारोपाला राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हे या शिबिराचे २८ वे वर्ष असून या शिबिराचा शुभारंभ ९ जानेवारी रोजी होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अर्जुन खोतकर आहेत. या कार्यक्रमांमध्ये विविध व्याख्यात्यांच्या व्याख्यानांच आयोजन करण्यात आल आहे. तर वेगवेगळ्या विषयावर सुमारे तीन दिवस विचार मंथन होणार आहे. हभप सदानंद मोरे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असून संत साहित्याच्या अभ्यासक डॉक्टर कोमल ठाकरे यांना पुरस्कार देखील देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याच आवाहन स्वागत अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर, बाभुळगावकर शास्त्री महाराज, डॉक्टर बळीराम बागल यांच्यासह आयोजक मंडळींनी केल आहे. शहरातील ज्ञान संजीवनी कॅम्पस राजपूतवाडी रोड सामनगाव येथे हे शिबीर भरविण्यात येत आहे..

अभाविप देवगिरी प्रदेश अधिवेशन लातूर नगरीत उत्साहात

बीड /प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे देवगिरी प्रांताचे अधिवेशन लातूर येथे दिनांक ३,४ व ५ जानेवारी रोजी पार पडले. यावेळी महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. अशी माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषद देवगिरी प्रदेशाध्यक्ष डॉ.सचिन कंदले यांनी दिली. यावेळी बीड शहराध्यक्ष डॉ.जगन्नाथ चव्हाण यांच्यासह अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत डॉक्टर सचिन कंदले यांनी यावेळी बोलताना सांगितले की अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ५९ वे देवगिरी प्रदेश अधिवेशन, लातूर येथे २, ३ व ४ जानेवारी दरम्यान पार पडले. या अधिवेशनात मराठवाडा व खान्देशातील विद्यार्थी परिषदेच्या १७ जिल्ह्यातून ५६७ विद्यार्थी, १२४ विद्यार्थिनी, ४६ प्राध्यापक असे एकूण ७३७ प्रतिनिधी उपस्थित होते.

०१जानेवारी २०२५ रोजी अधिवेशनाचे उद्घाटन राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभाविप राष्ट्रीय सह संघटनमंत्री एस.बालकृष्ण उपस्थित होते. अधिवेशनात शैक्षणिक सद्यस्थिती, सामाजिक सद्यस्थिती व स्वयंरोजगार, रोजगार निर्मिती तसेच उद्योजकता विकासाकडे युवकांची ओढ निर्माण करण्यासाठी सरकारने आखावा कृती आराखडा असे ३ प्रस्ताव पारित करण्यात आले.

यात प्राध्यापक भरती, महाविद्यालयांमधील वाढती अनुपस्थिती तसेच विद्यार्थिनींच्या निःशुल्क शिक्षणाबाबतचे प्रस्ताव पारित झाले. पर्यावरण, सेवा, क्रीडा, कला व उद्योजकता या विषयात समांतर सत्रांचे आयोजन करण्यात आले. ३ जानेवारीला २०२५ विकसित भारत २०४७ मध्ये युवकांची भूमिका या 'युवा मंच' सत्राच्या माध्यमातून मांडण्यात आली. दिवाणजी मंगल कार्यालय येथून गंज गोलाई या मार्गावर लक्षवेधी शोभायात्रेचे आयोजन केले गेले. यावेळी देवगिरी प्रदेशातून आलेल्या प्रतिनिधींनी आपापल्या जिल्ह्याची वेशभूषा करून या शोभायात्रेत सहभाग नोंदवला. अभाविप राष्ट्रीय मंत्री कु.शालिनी वर्मा व प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे यांच्यासह इतर विद्यार्थी नेत्यांनी जमलेल्या प्रतिनिधींना संबोधित केले. त्यानंतर शोभायात्रेचा समारोप जाहीर करण्यात आला. यानंतर पारंपारिक लोककलेचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. यात गवळण, पोवाडा, ओवी अश्या लोककलांचे सादरीकरण लातूर मधील कलावंतांनी केले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शिक्षण तज्ञ प्रा. अनिल राव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर विद्यार्थी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात व्यवस्था परिचय करून दिला व वर्ष २०२४-२५ ची प्रदेश कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अभाविप प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे यांनी आगामी दिशेची मांडणी करत येणाऱ्या काळात महाविद्यालयातील अनुपस्थितीचे सर्वेक्षण करणार असल्याचे सांगितले. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी नगर खेळ कुंभ, वाढती मास कॉपी लक्षात घेता कॉपी मुक्त भय मुक्त परीक्षा अभियान, स्वामी विवेकानंद व मासाहेब जिजाऊ जयंती पासून ते सुभाषचंद्र बोस जयंती (१२ जानेवारी ते २३ जानेवारी) दरम्यान युवक सप्ताह व राष्ट्रीय धोरणाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या भव्य अधिवेशनाचा समारोप अभाविप देवगिरी प्रदेश संघटनमंत्री सिद्धेश्वर लटपटे यांनी केला. ध्वजावतरण करून वंदे मातरमने अधिवेशनाची सांगता झाली.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रदेशाचे नेतृत्व करण्याची संधी आपल्या बीड जिल्ह्याला मिळाली प्रा.डॉ. सचिन कंदले सर यांनी या अधिवेशनामध्ये प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला व सोबतच काही विद्यार्थी कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या त्यामध्ये देवगिरी प्रदेश सहमंत्री स्वप्निल जी बगाडे, देवगिरी प्रदेश कार्यालय मंत्री अजय सपकाळ, प्रदेश कार्य समिती सदस्य प्रा. डॉ. सारंग जोशी (विकासर्थ विद्यार्थी) प्रांत प्रमुख प्रा. डॉ. अरुण पाटील व प्रदेश कार्यकारणी सदस्य म्हणून प्रा. डॉ. जगन्नाथ चव्हाण, आशिष वारे, सागर तोडकर, बळीराम सानप, हे बीड जिल्ह्यातील कार्यकर्तेही आता प्रदेशाचा नेतृत्व करणार आहेत त्यामुळे या अधिवेशनातून बीड जिल्ह्याला मोठी संधी मिळाली आहे.

शेतकऱ्यास गोदान देऊन बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे शिवसेनेचे शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांच्या वतीने दि ०९ जानेवारी गुरुवार रोजी माजलगाव येथील तुळजाभवानी मंदिरात आरती व अभिषेक करून तसेच मूकबधिर शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्नदान वाटप करून व शेतकऱ्यास हिंदू धर्मातील पवित्र अशा श्रेष्ठदान गोदान याचे दान करून बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला.

या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले , अभिजीत कोंबडे युवा सेना प्रमुख, रामेश्वर काशीद उ. तालुका प्रमुख अमित गिरी, विकास झेटे, विशाल चव्हाण, योगेश उगले,राहुल बावणे,दत्ता क्षीरसागर,सोमेश्वर धारक मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक अशोक थळपती सर तसेच बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त तुकाराम येवले यांनी मनोगत व्यक्त करून बाजीराव चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि दीर्घायुष्य लाभावे यासाठी देवीला साकडे घातले. तसेच थळपती सर यांनी बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करताना शुभेच्छा देऊन बाजीराव चव्हाण यांना दीर्घायुष्य लाभावे अशी मनोकामना केली. माजलगाव मध्ये बाजीराव चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करताना मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये बीड जिल्ह्याचा नाव लौकिक वाढवा-जिल्हाधिकारी अविनाश पाठक

बीड । प्रतिनिधी

दिनांक ९ जानेवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जालना येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धा नियोजनासाठी पूर्वतयारी बैठक पार पडली . या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , महेंद्रकुमार कांबळे , अरविंद लाटकर , कविता जाधव , फातेमा शेख , ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , तेजस्विनी जाधव , शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे , माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर , शिरुरचे तहसीलदार सुरेश घोळवे व इतर अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते . दरवर्षी महसूल विभागातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात येतात . यावर्षीही फेब्रुवारी महिन्यात जालना येथे या स्पर्धा संपन्न होणार आहेत . या स्पर्धेसाठी पूर्वतयारी म्हणून आज ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले व जेव्हा आपण स्पर्धांमध्ये भाग घेतो तेव्हा कोणी जिल्हाधिकारी नाही किंवा कोणी कोतवाल नाही , प्रत्येक पदाच्या व्यक्तीला या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा व जिल्ह्याचा मान वाढवावा असे म्हणून प्रोत्साहन दिले . या बैठकीमध्ये सर्व तालुक्यातील सहभाग घेऊ इच्छिणारे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . जालना येथे होणाऱ्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . त्यामध्ये क्रिकेट , फुटबॉल , हॉलीबॉल , खो-खो , कबड्डी , थ्रो बॉल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला आहे . तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये वैयक्तिक नृत्य , समूह नृत्य , गायन , नाटिका एकपात्री नाटिका अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश करण्यात आलेला आहे . त्यासाठीचे सखोल नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती . प्रत्येक प्रकारच्या स्पर्धासाठी एक समन्वय अधिकारी नेमून त्या त्या क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त बक्षीसे मिळवण्याचा संकल्प करण्यात आला . बीड हा कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा जिल्हा आहे व तिथे कलाकारांची कुठलीच कमतरता नाही , त्यामुळे या स्पर्धांमध्ये बीड जिल्हा अव्वल क्रमांकावर येईल असा विश्वास उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांनी केला . सांस्कृतिक कार्यक्रमांचे नेतृत्वही त्यांनी स्वीकारले . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संचलनाचे नेतृत्व स्वीकारले . सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट गायन , उत्कृष्ट अभिनय , उत्कृष्ट वैयक्तिक नृत्य , वेशभूषा , नकला , वादक , दिग्दर्शक अशा प्रकारे प्रत्येक उत्कृष्ट कलाकृतीला गुण दिले जाणार आहेत . सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यास ५० मिनिटे वेळ देण्यात येणार आहे . दरवर्षी या महसूल क्रीडा स्पर्धा दैनंदिन शासकीय कामापासून दूर राहणे व उत्साही होऊन पुन्हा जोमाने काम करणेस्तव लाभदायी ठरतात . त्यामुळे रोजच्या दैनंदिन कामकाजापासून दूर होऊन सगळ्यांसाठी ही एक पर्वणीच असेल . आरोग्यासाठीही खेळ हा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे . वर्षातून एकदा तरी आपण स्वतःसाठी वेळ काढून या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे आणि पूर्ण जोमाने बक्षीसे मिळवण्यासाठी प्रयत्न करावा , असे या बैठकीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले . महिलांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली .

यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व अधिकारी , कर्मचारी यांच्या वतीने आश्वासित केले की आम्ही सर्वजण एकोप्याने स्पर्धांची तयारी करू आणि बीड जिल्हा विभागात प्रथम कसा येईल यासाठी प्रयत्न करु . शेवटी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन बैठकीची सांगता केली .या बैठकीनंतरच लगेच महसूल अधिकारी बैठक घेण्यात आली . या बैठकीस उपविभागीय अधिकारी तहसीलदार उपस्थित होते . यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सूचित केले की मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत जिल्ह्यात जवळपास ३५ ठिकाणी सौर प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत . त्यासाठी सर्व अधिकारी यांनी प्रकल्प सुरळीतरित्या सुरू होण्यासाठी प्रयत्न करावेत . तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांचा कार्यक्रम घोषित केला आहे . यात मुख्यता कार्यालय स्वच्छता , प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे अशा बाबींवर प्रत्येक अधिकाऱ्याने स्वतः लक्ष द्यावे . बीड जिल्हा हा राज्यस्तरावर कसा येईल यासाठी प्रयत्न करावेत असे नमूद केले . इतर विषयांसोबतच अवैध करून खनिजाबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अत्यंत कडक शब्दात सांगितले की जिल्ह्यात कोठेही अवैधरित्या वाळू अथवा मुरूमाचे उत्खनन अथवा वाहतूक होत असल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी प्रसंगी गुन्हेही दाखल करण्यात यावेत. एकंदरीतच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा प्रशासनाने कात टाकली असल्याचे दिसून येत आहे . बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवण्यात अधिकाऱ्यांनी प्रयत्न केल्यास निश्चितच तसे चित्र दिसेल यात शंका नाही.

प्रा.डॉ.संतोष रणखांब यांना भारत सरकारचे पेटेंट मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी व सध्या कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठच्या प्राणिशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. संतोष रणखांब यांना जलचर प्रजाती नियंत्रण पद्धतीच्या उपकरणासाठी प्रा. डॉ.जयवंत ढोले, प्रा.डॉ.कृष्णा नागरे, प्रा.डॉ.जयकुमार शामराज व विलास अर्जुन जगताप यांच्यासह भारत सरकारचे पेटेंट मंजुर झाले आहे.

कै .रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. संतोष वसंतराव रणखांब,प्रा. जयवंत शिवाजीराव ढोले, शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब,कृष्णा राजू नागरे,इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड,प्रा.डॉ. जयकुमार नंदकुमार शामराज, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय धाराशिव व प्रा.डॉ. विलास अर्जुन जगताप कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी येथील प्राणीशास्त्र विषयातील प्राध्यापकांनी मिळून जलचर प्रजाती नियंत्रण व्यवस्थेचे उपकरण तयार केले असून त्यासाठी मार्च २०२४ मध्ये पेटंट कार्यालयाकडे अर्ज दाखल केला होता, त्यानंतर या उपकरणाबद्दल संपूर्ण माहिती कार्यालयास कळवण्यात आली, त्यानंतर दि ०३ जानेवारी रोजी या उपकरणाबद्दलची माहिती नियतकालिकातून प्रकाशित करून प्रमाणपत्र देण्यात आले.

या यशाबद्दल प्रा. डॉ.संतोष रणखांब व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन आप्पासाहेब जाधव,ॲड. नारायण गोले पाटील,ॲड. पांडुरंग गोंडे,ॲड. तुळशिराम रेडे,डॉ. रामदास सोळंके, रणजीत जाधव, शहाजी शेजूळ, विठ्ठल घोडके, सुदर्शन हिवरकर, भागवत खेत्री, संभाजी पाष्टे, प्रकाश पाष्टे, नारायण सोळंके, संपत सोळंके, हरिदास सोळंके यांच्यासह सर्व मित्रपरिवार व परिसरातील नागरिकांनी केले आहे.

बीड : ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरसकर यांच्या वाढदिवसानिमित्त मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, बीड तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, संपादक राजेंद्र होळकर, संपादक अभिमन्यु घरत, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, सिद्धेश्वर, उदय पाटील आदी उपस्थित होते.

शासकीय कार्यालयातील कामासाठी स्टॅम्प पेपरची मागणी करू नये

बीड । प्रतिनिधी

शासकीय कामकाजासाठी आणि विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शंभर रुपये मूल्यांचे स्टॅम्प पेपर आता रद्दबातल झाल्याने अनेक बाबतीत ५०० रुपये मूल्याच्या स्टॅम्प पेपरची मागणी होते ती यापुढील काळात करण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश व सूचना नोंदणी महानिरीक्षक यांच्या कार्यालयातर्फे जारी करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील आधिसूचना क्रमांक मुद्रांक २००४२/ १६६३/ प्र.क्र. ४३६/-१ दिनांक १/७/२००४ अन्वये शासकीय कार्यालयातील जात प्रमाणपत्र/ वास्तव्य प्रमाणपत्र, तसेच राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र या शासकीय कार्यालयासमोर करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक अधिनियमातील अनुसूची एक मधील अनुच्छेद -४ अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७२ दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ अन्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिशिष्ट -एक मधील अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यात आली असून अनुच्छेद क्रमांक ४, ५, ८, , २७, ३०, ३८, ४४, ५०, ५२, ५८ मध्ये रुपये १००/- किंवा रुपये २००/- ऐवजी रुपये ५००/- मुद्रांक शुल्क करण्यात आले आहे.

उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगरर यांचे संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना नागरिकांकडून मुद्रांकाचा आग्रह करू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच ई-सेवा केंद्रामध्ये नागरिकांकडून सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी रुपये १००/- स्टॅम्प पेपरची मागणी करीत असतात. दिनांक १४/ १०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार ही सेवा केंद्रामध्ये पक्षकाराकडून रुपये ५००/- चे स्टॅम्प पेपरची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय कार्यालय तसेच न्यायालयासमोर दाखल करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर मुद्रांक शुल्क माफ केलेले असल्याने या संदर्भात आपल्या अधिपत्याखाली असलेले उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना मार्गदर्शन करण्यात यावे, असे नोंदणी महानिरीक्षक यांनी स्वतंत्र पत्राद्वारे कळविले आहे.

पाटोद्यात धनंजय मुंडे समर्थक आक्रमक

तर पाटोदा पोलीस ठाण्यात मोठी घोषणाबाजी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशनमध्ये मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी आक्रमक पवित्रा घेत सकाळपासून ठिय्या आंदोलन केला आहे यामध्ये पोलीस स्टेशनमध्ये मोठ्या घोषणाबाजी करण्यात आले आहे यामध्ये मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी यावेळेस केली आहे. तर त्याचबरोबर सुरेश धस अंजली दमानिया यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात यावा ही मागणी या कार्यकर्त्यांनी केली आहे गुन्हा दाखल होईपर्यंत हा ठिय्या मागे घेतला जाणार नाही असाही पवित्र या कार्यकर्त्यांनी घेतला यामध्ये तीन तासाच्या नंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे यामध्ये यादी पोलीस ठाण्यात गटाचे समर्थक देखील अगोदर याच पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी गेले होते मात्र हे समर्थक बाहेर पडतात धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी सकाळी दहा वाजल्यापासून पोलीस ठाण्यासमोर हे आंदोलन सुरू केलं यामध्ये मोठ्या घोषणाबाजी करण्यात आल्या त्याचबरोबर त्या घोषणाबाजी मध्ये काही वेळासाठी तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचे देखील पाहायला मिळाले कारण दोन्हीही समर्थक आमने-सामने जरी आले नाही तरी घोषणाबाजी मूळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं आता या मागणीमुळे आणि धनंजय मुंडे समर्थक यांनी केलेल्या मागणी ही पोलिसांनी ऐकत आता गुन्हा दाखल केला आहे.

जिजामाता चौक रस्ता वाहतुकीसाठी बंद पर्यायी रस्त्याचा वापर करा- नाईकवाडे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोंढा रोडवर सिमेंट काँक्रिटीकरण चालू असून हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. दोन दिवसापूर्वीच सावता माळी चौक हा वाहतुकीसाठी खुला केला असून जिजामाता चौकाचे काम सुरू झाले आहे. हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून नागरिकांनी पर्याय रस्त्याचा अवलंब करावा असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

जालना रोड ते मोंढा जोडणाऱ्या रस्त्याचे काम सध्या जोरात सुरू आहे. हे काम जवळपास संपूर्ण होत असून जिजामाता चौकातील काँक्रिटीकरण आणि बिंदुसरा नदीवरील पुल जोडण्याचे काम चालू आहे .या पुलावर सिंगल लेयर काँक्रीट टाकण्याचे काम सोमवारपासून सुरू होणार आहे. त्यामुळे हाय रस्ता काही दिवस वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागणार आहे. मोंढ्यातून बस स्थानकाकडे येणाऱ्या नागरिकांनी आंबेडकर पुतळा -सुभाष रोड मार्गे यावे. पुलाचा रस्ता पूर्णपणे बंद करण्यात येणार असल्याने या पर्याय रस्त्याचा वापर करावा याबरोबरच जिजामाता चौकातून दोन्ही बाजूला जाणाऱ्या नागरिकांनी पर्याय रस्त्याचा वापर करावा .या चौकाचे सिमेंट काँक्रिटीकरण झाल्यानंतर हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल अशी माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली. या रस्त्याच्या कामासाठी नाईकवाडे यांनी स्वतः लक्ष घालून हा रस्ता पूर्ण करून घेतला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या अंतिम टप्प्यात झालेल्या कामाचे लवकरच काँक्रिटीकरण करून हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली.

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे समाजभूषण पुरस्कार जाहीर

पुरस्कारात विविध क्षेत्रातील विविध नामवंत मान्यवरांचा समावेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या वतीने विविध क्षेत्रातील विविध नामवंत मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल तथा नवनियुक्त अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी नुकतेच या नावाची घोषणा केली आहे. या पुरस्काराचे वितरण अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महा अधिवेशनात वितरित करण्यात येणार असल्याची माहिती नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

पुरस्कार जाहीर करण्यात आलेल्या मध्ये प्रामुख्याने आमदार प्रदीप शिवनारायन जायसवाल (छत्रपती संभाजीनगर), माजी आमदार तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश नाथुलालजी चौधरी ,(बडी सादडी जिल्हा चितोडगड , राजस्थान), प्रदीपकुमार धिरजलालजी जायसवाल (बडोदा ,गुजरात), जेष्ठ समाजसेवक भरतलाल बाबूलालजी जायसवाल (इंदोर, मध्यप्रदेश), जेष्ठ समाजसेवक ईश्वरचंदजी रामकांतजी साव (मुंबई, महाराष्ट्र) , बी मधूसुदनजी जायसवाल (हैदराबाद ,तेलगाणा) , लक्ष्मी ◀◀ पान ३ वर

किसानपुत्र आंदोलनाचे उद्या व परवा जालन्यात शिबीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

किसानपुत्रांचे राज्य स्तरीय चिंतन शिबीर जालन्यातील कृषी विज्ञान केंद्र येथे उद्या व पर्वा दि ११ व १२ जानेवारी होणार आहे. या शिबिरात शेतकरी स्वातंत्र्यासाठी न्यायालयीन लढाईची दिशा या विषयावर चर्चा होणार आहे.

या शिबिरात ऍड सागर पिलारे (कोल्हापूर) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. विजय आण्णा बोराडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून या शिबिरात ऍड सुभाष खंडागळे (पुसद), श्री अमृत महाजन (आंबाजोगाई), ऍड महेश गजेंद्रगडकर (पुणे), डॉ विकास सुकाळे (नांदेड), श्री सतीश देशमुख (पुणे), डॉ प्रशांत शिनगारे (पुणे), अनंत देशपांडे (लातूर), डॉ राजीव बसर्गेकर (मुंबई) व अमर हबीब (अंबाजोगाई) हे विविध विषयांची मांडणी करणार आहेत.

शिबिरात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिबिरार्थी भाग घेणार आहेत.

राजमाता जिजाऊ क्रिकेट अकॅडमीच्या नुमान शेख याची निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील नुमान शेख याची कोटा (राजस्थान) येथे होणाऱ्या विद्यापीठ झोन इंडिया क्रिकेट स्पर्धेसाठी नुकतीच निवड झाली आहे.

नुमान शेख याने कठोर सराव व अचूक कौशल्याने क्रिकेटमध्ये प्रावीण्य मिळवले आहे. त्याची ही निवड म्हणजे राजमाता जिजाऊ अकॅडमीच्या प्रशिक्षक शेख रहीम सर व त्याच्या मेहनतीचे फळ आहे. ही निवड राजमाता जिजाऊ क्रिकेट अकॅडमीमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे शक्य झाली आहे. नुमान शेख याने आपल्या उत्कृष्ट बॉलिंग आणि अष्टपैलू खेळाने निवड समितीला प्रभावित केले. त्याच्या निवडीमुळे स्थानिक क्रिकेट समुदायात आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या या निवडीमुळे पुन्हा एकदा आष्टीचे नाव क्रिकेट मध्ये उज्वल केले आहे. नुमान शेख याने आष्टी, बीड, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, अहील्यानगर, नाशिक ◀◀ पान ३ वर

राजस्थानच्या कोटा येथे भारताच्या विद्यापीठ झोन क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते नारायणगाव येथे ग्लोबल कृषी महोत्सवाचे उद्घाटन

शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्यासोबतच कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्याचा कृषीमंत्र्यांचा मानस

पुणे । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्यासोबत त्यांच्या उत्पन्नात वाढ व त्या उत्पादनाला संरक्षित भाव मिळवून देण्यासाठी कृषी विभागाशी निगडित सर्व संबंधित विभागाच्या मंत्र्यांसोबत बैठक घेवून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, आगामी काळात कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्याचा मानस कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केला.

ग्रामोन्नती मंडळ, कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव यांच्यावतीने ९ ते १२ जानेवारी कालावधीत आयोजित 'ग्लोबल कृषी महोत्सव' प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार शरद सोनवणे, उप विभागीय अधिकारी गोविंद शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, आत्माचे प्रकल्प संचालक सूरज मडके, उपसंचालक श्रीधर काळे,उप विभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाठ, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष कृषीरत्न अनिल मेहर, प्रमुख डॉ. प्रशांत शेटे, ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त, अध्यक्ष सुजित खैरे, माजी आमदार अतुल बेनके आदी उपस्थित होते.

कृषी मंत्री ड. कोकाटे म्हणाले, शेतकऱ्यांपुढे अनेक प्रश्न असून त्यांना या क्षेत्रात सुरक्षितता उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. कृषी महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उपयोग कृषी क्षेत्राला झाला पाहिजे, त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. यादृष्टीने त्यांनी तांत्रिक शेती, विविध संशोधन, दर्जेदार बी-बियाणे, खत उत्पादन, आदी बाबींवर भर दिला पाहिजे, शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. शेती आणि बाजारपेठ परस्परपूरक बाबी असल्याने शेतीमाल ते बाजारपेठ अशी साखळी निर्माण करण्याची गरज आहे. परवानाधारक दुकानदार यांनी प्रामाणित खते, बी-बियाणे घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांनावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. राज्यात विविध पीकपद्धती घेतली जाते, पारंपरिक पीकपद्धती आणि आधुनिक पीकपद्धती यांच्यामधील फरक समजून

घेतला पाहिजे. अनेक शेतकरी प्रयोगशील असून कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रयोग करीत असतात. त्यांचे अनुकरण केले पाहिजे. शेतकऱ्यांनी शेतात नवनवीन तंत्रज्ञान वापरून अधिकाधिक उत्पादन घेतले पाहिजे, याकरीता राज्यशासन आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील. शेतीशी संबंधित केंद्र शासनाशी निगडित प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री यांच्याशी चर्चा सुरु आहे, आगामी काळात केंद्र शासन आणि राज्य सरकार मिळून यामध्ये सकारात्मक मार्ग काढण्यात येईल. कृषी क्षेत्राशी संबंधित सर्व प्रकारच्या सेवा शेतकऱ्यांना एका क्लिकवर मिळाव्यात याकरीता लवकरच उपयोजक (प) विकसित करण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टाळण्यासोबतच त्यांच्या वेळेत बचत होईल तसेच पारदर्शक पद्धतीने त्यांच्या खात्यात लाभाचे हस्तांतरण होईल. पीक नुकसानीचे पंचनामे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्यासोबतच पीकविम्याच्या अनुषंगाने अडचणी दूर करण्यात येईल. कृषी विद्यापीठाच्या जमिनी कृषी विज्ञान केंद्र तसेच प्रयोगशील शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर देण्याचा विचार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ, शेतीतील पिकाची शाश्वती, शेतमालाला हमीभाव मिळवून शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन धोरण तयार करण्यात येईल. जुन्नर परिसर हा शेतीसाठी प्रयोगशील परिसर आहे. या परिसरात उत्पादित हापूस आंब्याला भौगोलिक मानांकन मिळाले आहे, याकरीता राज्य शासनाने प्रयत्न केले. या कृषी विज्ञान केंद्राद्वारे प्रत्यक्ष शेतीत विविध प्रकारच्या प्रयोगाची अंमलबजावणी या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून केली असून शेतीशी निगडित नवीन ज्ञान याठिकाणी प्राप्त होते आणि ते शेतकऱ्यासाठी मार्गदर्शक आहे.

आमदार श्री. सोनवणे म्हणाले, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, त्याची सेवा करणारे खाते म्हणून कृषी विभागाकडे पाहिले जाते. शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, शेतकऱ्यांला कमी खर्चात अधिक उत्पन्न, शेतमालाला हमीभाव, अद्ययावत शेतकरी भवन, दूध अनुदान, पशुधनासाठी लसीचा पुरवठा, परिसरात बिबट्याची संख्या लक्षात घेता दिवसा वीज उपलब्ध करणे आदी प्रश्न मार्गी लावून शेतकऱ्यांकरीता लोककल्याणकारी धोरण राबविण्याच्या श्री. सोनवणे यांनी सूचना केल्या. श्री. मेहेर म्हणाले, शेतकऱ्यांना विकसित तंत्रज्ञानाचा लाभ मिळण्यासोबतच शेतकऱ्यांचे कमीतकमी खर्चात अधिकाअधिक गुणवत्तापूर्वक उत्पादनाच्यादृष्टीने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहेत. या प्रयत्नासाठी कृषी विज्ञान केंद्र नेहमी प्रयत्नशील आहे. या प्रदर्शनात शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास मदत होते. राज्य शासनाच्या धोरणानुसार या केंद्रात नैसर्गिक शेती प्रकल्प राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना हवामानानुसार पीक पद्धती घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे, असेही श्री. मेहेर म्हणाले. यावेळी डॉ. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते 'शिवनेरी हापूस आंबा' लोगो आणि बॅसेलीस जैविक खते, जैवसंपृक्त पिके घडीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. ग्रामोन्नती कृषी सन्मान पुरस्काराचे वितरणही करण्यात आले. प्रदर्शनाच्या उद्घाटनापूर्वी मंत्री श्री. कोकाटे यांनी परिसरात लावण्यात आलेल्या स्टॉलला भेट देवून माहिती घेतली. प्रदर्शनाच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले.

मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू

पुणे । प्रतिनिधी

मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायचा प्रकार गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने उघडकीस आणला आहे. सिंहगड रस्त्यावरील धायरी भागात एका मसाज पार्लरवर छापा टाकून पोलिसांनी पार्लरचालक महिलेसा अटक केली आहे. जोयश्री नरेन तामोली (वय ३२, नांदेड फाटा सिंहगड रस्ता . मूळ रा. बामुनगाव. जि जोराहाट. आसाम) असे अटक करण्यात आलेल्या मसाजपार्लर चालक महिलेचे नाव आहे. या बाबतत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेतील सहायक पोलिस फौजदार छाया जाधव यांनी नांदेड सिटी रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली

आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनूसार सिंहगड रस्त्यावरील धायरी भागात डे स्पा या मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली त्यानंतर पोलिसांच्या पथकाने मंगळवारी सायंकाळी छापा टाकला मसाज पार्लरमधून तरूणींना ताब्यात घेण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भोस तपास करत आहेत.

शहरातील अनेक भागात मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी पोलीस आयुक्त अमितेश कुमार आयुक्ता अमितकुमार यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पोलीस आयुक्तांनी मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.

पुण्यामध्ये तरुणाकडून दोन लाखांची अफू जप्त

पुणे : काल गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने खराडी परिसरात राजस्थानातून अफू विक्रीसाठी आलेल्या.तरूणा काल आटक केली आहे.

त्याच्याकडून दोन लाख २२ हाजार रूपयाची अफू व वजनकाटा असा मुद्देमाल जप्त केला आहे. विजयसिंग खिमासिंह राजपुरोहित (वय ३७ रा. क्रांतीपार्क , खराडी मूळ रा. राजस्थान असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

अमली पदार्थ विरोधी पथक खराडी भागात गस्त घालत होते. त्यावेळी संत तुकारामनगर भागातील एका दुकानाजवळ विजयसिंग राजपुरोहीत थांबला असून. त्याच्याकडे अफू असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली.पोलिसांच्या पथकाने सापळा रचला व त्याला पकडले त्याची तपासनी केली असता त्याच्या कडे तेव्हा पिशवीत दोन लाख २२ हजार रूपयांची १११ ग्रॅम अफू वजनकाटा असा. मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस उपायुक्त निखील पिंगळे सहायक आयुक्त गणेश इंगळे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उल्हास कदम सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, संदिप शिरके,मारूती पारधी , प्रवीण उत्तेकर , विशाल दळवी, संदेश काकडे, यांनी ही कारवाई केली.

सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक; तब्बल ३८ लाखांना घातला गंडा

पुणे : सायबर फसवणूकीचे सत्र कायम असून, वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन ज्येष्ठ नागरिकांना सायबर चोरट्यांनी तब्बल ३८ लाख रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी पर्वती आणि हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात ८० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने तक्रार दिली आहे.

तक्रारदार अरण्येश्वर भागात राहायला आहेत. गेल्या महिन्यात १५ डिसेंबर रोजी सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइलवर संपर्क साधला. त्यांना एका नामांकित बँकेतून बोलत असल्याची बतावणी केली. त्यांना अधिकारी बोलत असल्याचे सांगत विश्वास संपादन केला. त्यांना डेबिट कार्ड सुविधा अद्ययावत करण्यात येत आहे, अशी माहिती दिली. नंतर त्यांच्याकडून बँक खात्याची गोपनीय माहिती घेतली. नंतर

चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून १९ लाख ९० हजार रुपये चोरून नेले. अधिक तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल मोरे तपास करत आहेत.

दुसऱ्या घटनेत सायबर चोरट्यांनी हडपसरमधील ज्येष्ठ नागरिकाची १८ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली. चोरट्यांनी २१ डिसेंबर रोजी त्यांना मोबाइलवर संपर्क साधला. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीचे देयक थकीत असल्याने गॅस पुरवठा बंद करू अशी भिती दाखवली. नंतर देवेश जोशी असे नाव असणाऱ्या चोरटचाच्या मोबाइलवरून त्यांना संपर्क साधला. त्याने ऑनलाईन पेमेंटसाठी म्हणून त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. या माहितीचा गैरवापर करुन खात्यातून १८ लाख २५ हजार रुपये चोरुन नेले. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक काळंगे तपास करत आहेत.

अमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई; अफू विक्री करणाऱ्याला ठोकल्या बेड्या

पुणे । प्रतिनिधी

आयटी क्षेत्र असलेल्या खराडी परिसरात राजस्थानातील अफू विक्री करण्यासाठी आलेल्या एका तरुणाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले आहे. त्याच्याकडून २ लाख २२ हजार रुपयांची अफू, वजनकाटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विजयसिंग खिमासिंग राजपुरोहित (वय ३७, रा. क्रांतीपार्क, खराडी, मूळ रा. राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी खराडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमली पदार्थ विरोधी पथक खराडी भागात गस्त घालत होते. तेव्हा संत तुकारामनगर भागातील दुकानाजवळ राजपुरोहित थांबला असून, त्याच्याकडे अफू

असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेतली. तेव्हा पिशवीत दोन लाख २२ हजार रुपयांची १११ ग्रॅम अफू, वजनकाटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हा अफू राजस्थानातील आहे. राजस्थानातील अफूला पुण्यात मोठी मागणी आहे. त्याठिकाणचा अफू पुण्यातील विशिष्ट तरुण तसेच काही कामगार वर्ग विकत घेत असल्याची माहिती पोलिसांच्या कारवाईतून वेळोवेळी समोर आलेली आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, संदीप शिर्के व त्यांच्या पथकाने केली आहे.

भरधाव ट्रकची दुचाकीला धडक; डॉक्टर महिलेचा मृत्यू

पुणे : उशीर झाल्याने मुलाला शाळेतून आणण्यासाठी गडबडीत निघालेल्या डॉक्टर आईचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाला. याघटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कात्रज-हांडेवाडी रस्त्यावर बुधवारी दुपारी हा अपघात ट्रक व दुचाकीचा अपघात झाला. याप्रकरणी ट्रकचालकाला काळेपडळ पोलिसांनी अटक केली आहे. प्रणाली तन्मय दाते (वय ३४, रा. व्हीटीपी अर्बन सोसायटी, उंड्री) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी ट्रकचालक पांडुरंग बलभीम भोसले (वय ३५, रा. तुळजापूर, जि. धाराशिव) याला अटक करण्यात आली. स्नेहा अनिल कदम (वय ३९,रा. गोदरेज प्राणा सोसायटी, उंड्री) यांनी याबाबत काळेपडळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, डॉ. दाते यांचा उंड्री परिसरात दवाखाना आहे. डॉ. दातेंचा मुलगा हांडेवाडी रस्त्यावरील एका शाळेत शिकतो. मुलाला शाळेतून आणण्यासाठी थोडा उशीर झाला होता. त्यामुळे बुधवारी (८ जानेवारी) दुपारी बाराच्या सुमारास त्या गडबडीने दुचाकीवरुन हांडेवाडी रस्त्याने जात होत्या. त्यावेळी ट्रक व दुचाकीचा विचीत्र



अपघात झाला. डॉ. दाते रस्त्यावर पडल्या असताच ट्रकच्या पाठिमागील चाकाखाली त्या आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालक पसार झाला. घटनेची माहिती मिळताच काळेपडळ पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. डॉ. दाते यांच्यामागे पती व मुलगा असा परिवार आहे. त्यांचे पती डॉक्टर आहेत. पोलीस उपनिरीक्षक अनिल निंबाळकर अधिक तपास करत आहेत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा सुरू

पुणे : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा दि. ७ जानेवारीपासून सुरू होणार आहेत. ही परीक्षा २३ जानेवारीपर्यंत असणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या हिवाळी सत्रातील प्रवेशित नियमित विद्यार्थांची सत्र परीक्षा व मे २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ही परीक्षा घेतली जाणार आहे.

महाराष्ट्र भरातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रावर प्रवेश घेतलेले जवळपास एक लाख ९ हजार २३७ विद्यार्थी ही परीक्षा देतील. राज्यातील विविध २३५ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे.परीक्षेसंदर्भातील आवश्यक ती सर्व शैक्षणिक व प्रशासकीय तयारी विद्यापीठातर्फे पूर्ण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी मदत यंत्रणाही कार्यरत करण्यात आलेली आहे. काही समस्या उद्भवल्यास विद्यार्थ्यी विद्यापीठ मदत केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

परीक्षा आयोजनाच्या सर्व मार्गदर्शक सूचना विभागीय केंद्रांमार्फत परीक्षा केंद्रांना देण्यात आलेल्या आहेत. पोर्टलवरच विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या या परीक्षा सुरू होत आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक ती काळजी घेतली जाणार असल्याची माहिती परीक्षा नियंत्रक विभागाने दिली आहे.

बंदुकबाजांची होणार पडताळणी; खरोखर आवश्यकता तपासणार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडींची माहिती

पुणे: स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाना घेऊन बंदूक सोबत बाळगली जाते. विशेष म्हणजे, या पिस्तुलाचा उपयोग प्रत्यक्षात करण्याची गरज भासत नाही. यात वापरलेल्या प्रत्येक गोळीचा हिशेब द्यावा लागतो. आपल्याकडे बंदूक असल्यास लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. त्यामुळे बंदूक परवाना मिळविण्यासाठी आटापिटा केला जातो. तर गेल्या काही दिवसांपासून परवना असलेल्या बंदुकीचा गैरवापर होत आहे, त्याकडे माहिती पुणे जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे लक्ष वेधले असता, ते म्हणाले, जिल्ह्यातील परवानाधारक बंदुकबाज याची पडताळणी केली जाईल,त्यांना आज खरेच शस्त्राची गरज आहे का, हे पाहिले जाईल.

साताऱ्यात जिल्हाधिकारी असतांना आदर्श शाळा आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र तयार केले होते. हाच सातारा पटर्न जिल्ह्यातही राबविण्यात येणार असल्याचा मानस नवनियुक्त जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी पत्रकार परिषदेत बोलून दाखवला. यावेळी बोलतांना डुडी म्हणाले की, आदर्श शाळा आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र प्रकल्प प्रायोगिक तत्वावर नाही तर संपूर्ण जिल्ह्यात राबविणात येणार आहे.

जिल्हा नियोजन समितीतील निधी बरोबर शासनाच्या विविध



योजनांच्या निधीचा वापर करण्यात येणार आहे लाभ घेण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या मदतीने प्रत्येक गावात एक आदर्श शाळा निर्माण करण्यात येणार आहे. एका शाळेत ५०० विद्यार्थी आणि कमीतकमी १५ शिक्षक असतील. आदर्श शाळेत पायाभूती सुविधा निर्माण करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे हे मुख्य धोरण असणार आहे. या शाळांमध्ये शिक्षणाबरोबर क्रिडा, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी पुढे जायला हवे.

राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अनेक आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभगाने हे आदेश काढले आहेत. सामान्य प्रशासन विभगाचे अप्पर सचिव व्ही. राधा यांनी हे आदेश काढले आहेत. त्यामध्ये पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची देखील बदली करण्यात आली आहे. दरम्यान डॉ. सुहास दिवसे यांना सरकारकडून पदोन्नती देण्यात आली आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची बदली झाली आहे. त्यामुळे आता साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे पुण्याचे नवीन जिल्हाधिकारी असणार आहेत. तर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची साताऱ्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे, राज्य शासनाने १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यामध्ये काही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

लाचप्रकरणी कारवाईचा अहवाल शासनाला : जितेंद्र डुडी

जिल्हा परिषदेचे लाचखोर माध्यमिक शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे आणि अधिक्षक विजयकुमार सोनवणे यांच्यावर कारवाईची शिफारस करणारा अहवाल शासनाला पाठवण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डूडी (गळींशपवीर ऊँवळ) यांनी दिली. माध्यमिक शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे आणि अधीक्षक विजयकुमार सोनवणे यांना दोन दिवसापूर्वी एक लाख ७० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते.